मेहता मराठी ग्रंथजगत

ऑगस्ट, २०२३
पृष्ठे ६८ किंमत : रु.१५
वर्ष तेविसावे
अंक आठवा

पुरस्कारासाठी आवाहन

'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे संचालक श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सन २०२४ पासून **'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'** देण्यात येणार आहे. या पुरस्काराची घोषणा १० जानेवारी, २०२३ रोजी डॉ. किरण बेदी यांच्या उपस्थितीत केली गेली.

या पुरस्काराचे स्वरूप खालीलप्रमाणे असून साहित्य क्षेत्रात प्रथम प्रकाशनास प्रोत्साहनपर हा पुरस्कार दिला जाणार आहे.

'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'

सर्वोत्कृष्ट कादंबरी
३०,०००/-

सर्वोत्कृष्ट कथासंग्रह
२०,०००/-

पुरस्कारासाठी अर्ज करण्यासंदर्भात प्राथमिक नियम व अटी :

१. १ जानेवारी, २०२३ ते ३० सप्टेंबर, २०२३ दरम्यान प्रकाशित झालेली पहिली साहित्यकृती या पुरस्कारासाठी ग्राह्य धरली जाईल.

२. १ ऑक्टोबर, २०२३ ते १ नोव्हेंबर, २०२३ या कालावधीत पुरस्कारासाठीचे अर्ज स्वीकारण्यात येतील.

या पुरस्काराची घोषणा जानेवारी २०२३ मध्ये केली गेली असून १२ जानेवारी, २०२४ रोजी श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिदिनी पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे. तरी इच्छुक साहित्यिकांनी आपले साहित्य मेहता पब्लिशिंग हाऊसच्या पत्त्यावर पाठवावे.

मेहता मराठी ग्रंथजगत

◆ ऑगस्ट २०२३ ◆ वर्ष तेविसावे ◆ अंक आठवा

संपादक :
अखिल मेहता

संस्थापक संपादक :
शंकर सारडा

अंकाची किंमत १५ रु.
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.

प्रसिद्धी :
दरमहा ११ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी

मेहता पब्लिशिंग हाऊस

– अनुक्रमणिका –

संपादकीय	**४**
विशेष लेख	**८**
पुस्तकाच्या पानांतून	
इथे थबकली गंगामाई	१४
अर्धनारी	२०
एकाकी सुगी	२६
रिपोर्टिंग पाकिस्तान	३४
लाल बर्फाचे खोरे	४४
द वॉन्टेड	५०
अभिप्राय	**५४**
दिनविशेष	**६१**

संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ । E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.

संपादकीय

शंकर पाटील : ग्रामीण नवकथेचे शिलेदार

मराठी साहित्यात १९६०च्या दशकानंतर अनेक नवे बदल झालेले आपल्याला पाहायला मिळाले. नवकविता जशी बहरली होती त्याच धर्तीवर नवकथाही आपली स्वतंत्र वाट शोधू पाहत होती. साहित्य प्रकारांतील 'कथा' हा जास्त वाचला जाणारा व त्याच प्रमाणात लिहिला जाणारा वाङ्मयप्रकार. अरविंद गोखले, पु. भा. भावे आणि गंगाधर गाडगीळ हे नवकथेचे जनक. त्यानंतर अनेक लेखक नवकथेची वाट चोखाळू लागले. व्यंकटेश माडगूळकर, द. मा.मिरासदार, शंकर पाटील, रणजित देसाई, अण्णा भाऊ साठे, बाबूराव बागूल इत्यादी त्या काळातील प्रसिद्ध समकालीन कथाकार होते. त्यादरम्यान 'नवकथा' हा प्रकार मराठी साहित्यात स्थिरावला व त्या परंपरेत लेखन करणाऱ्या लेखकांनी मराठी कथेचे दालन नवकथेच्या रूपाने समृद्ध केले.

माडगूळकर, मिरासदार, पाटील या तिघांनीही उमेदवारीच्या काळात नियमित कथालेखन केले. अशा प्रकारे या लेखकांनी अखेरपर्यंत कथालेखन केले, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. ग्रामीण पार्श्वभूमीवर फुलत जाणारी कथा, वाचकाला एका वेगळ्याच भावविश्वाचा अनुभव प्राप्त करून देत अंतर्मुख करायला लावते. अशी कथा हे या लेखनाचे विशेष अंग. दरम्यानच्या काळात प्रादेशिक पार्श्वभूमी असलेल्या लेखनाची पुस्तकेही प्रकाशात येत होती. महाराष्ट्राच्या विविध भागांतील भौगोलिक चित्रण या पुस्तकात वाचायला मिळत होते.

सत्यकथा व इतर वाङ्मयीन नियतकालिकांत तत्कालीन संपादकांनी नवकथेला भरभरून वाव

दिला. त्यामुळेच मासिकांत, दिवाळी अंकांत या कथाकारांची कथा हवीच, असे समीकरण बऱ्याच काळापर्यंत होते. माडगूळकर, मिरासदार, पाटील यांच्या कथांचा बाज जरी ग्रामीण असला, तरी ते लेखन वाचकांना भावणारे असल्याने त्याला विशेष असे महत्त्व होते. या तिघांच्याही लेखनाची ढोबळमानाने तुलना केली तर माडगूळकर यांचे लेखन गंभीर असे, मिरासदार यांचे विनोदी ढंगाचे तर पाटील यांचे लेखन गंभीर व विनोदी अशा संमिश्र स्वरूपाचे! ही ठळक अशी निरीक्षणे हे लेखन वाचत असताना जाणवते.

शंकर पाटील हे एक महत्त्वाचे कथाकार. कादंबरी, वगनाट्य, पटकथा, संवादलेखन, एक अनुवादित कादंबरी इत्यादी लेखन हे त्यांचे साहित्याच्या क्षेत्रातील काम. हे सर्व असले तरी कथासाहित्यात त्यांनी केलेली मोलाची कामगिरी आपल्या नजरेत सहज भरते. अशा लेखकांचे साहित्य काही वर्षांपूर्वी बाजारात उपलब्ध नव्हते. सुरुवातीला 'धिंड', 'पाटलांची चंची' आणि 'खुळ्याची चावडी' हे तीन कथासंग्रह आमच्या प्रकाशन संस्थेच्या माध्यमातून पुनर्प्रकाशित केले. त्याला वाचकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. त्यानंतर शंकर पाटील यांचे सर्वच कथासंग्रह आम्ही प्रकाशित केले. 'टारफुला' ही कादंबरी, 'शापित वास्तू' ही अनुवादित कादंबरी व वगनाट्ये असे संपूर्ण साहित्य आम्ही सुधारित आवृत्यांच्या स्वरूपात वाचकांसाठी उपलब्ध करून दिले.

आजही वाचकप्रिय या सदरात मोडणारे साहित्य व लेखक म्हणून शंकर पाटील हे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. या काळात आजही पाटील यांच्या साहित्याला वाचकांची चांगली मागणी असून, त्या पुस्तकांच्या नवीन आवृत्त्या सातत्याने बाजारात येत असतात. आमची ग्रंथसूची समृद्ध करणाऱ्या लेखकांपैकी एक लेखक म्हणून शंकर पाटील हे नाव आपसूकच नजरेसमोर येते. साहित्यक्षेत्रात आपल्या साहित्याच्या रूपाने 'पाटीलकी' करणाऱ्या शंकर पाटील यांची ८ ऑगस्टला जयंती होती. त्यानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!

अखिल मेहता

मेहता मराठी ग्रंथजगत

नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी
आजच वर्गणीदार व्हा.

आमच्या छापील अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ४५०रुपये
पंचवार्षिक वर्गणी ६००रुपये

डिजिटल अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ३००रुपये
पंचवार्षिक वर्गणी ४००रुपये

Available on

amazonkindle | Google Play Books

Find us on: facebook®

https://www.facebook.com/mehtapublishinghouse

मेहता पब्लिशिंग हाऊस

BOOK CLUB
या क्लबचे सभासद व्हा.
आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके
निम्म्या किंमतीत मिळवा!

टी बुक क्लब

आजच व्हा सदस्य,
निम्म्या किंमतीत
मिळवा पुस्तकं

* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक

टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!

₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा
सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५

सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -
www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx

नाहीत स्कॅन केलेली पाने
किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच,
खरीखुरी **eBooks**
युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर –
थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड,
किंडल आणि ॲन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

available on :
ebook

amazonkindle | Get it on Apple Books | Google Play Books

विशेष लेख

शंकर पाटील : मराठी साहित्यातील लेणे

ते वर्ष असावे १९८८-८९. फलटणच्या महाविद्यालयात प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी माझे वडील आनंद यादव, द. मा. मिरासदार आणि शंकर पाटील यांच्या कथाकथनाचे आयोजन केले होते. लेखक-शंकर पाटील त्यांच्या कथावाचनातून मला माहीत होते; पण या सुमारास मी त्यांना प्रत्यक्ष पाहिले. मध्यम बांधा, सावळा रंग, पांढरे केस आणि कुणालाही आपुलकी वाटावी, असे त्यांच्या चेहऱ्यावरील ममतेचे भाव! आजही त्यांची ही प्रतिमा नजरेसमोर उभी राहते.

कथाकथन ऐकण्यासाठी सभामंडपात विद्यार्थ्यांची माठी गर्दी होती. शंकर पाटील यांनी आपली विनोदी कथा खुमासदार निवेदन, अस्सल ग्रामीण बोलीभाषेतील संवाद यांतून नाट्यमय रीतीने सादर केली. कथाकथन करताना ते स्वत: त्या कथेत रमून गेले. कथेतील घटनाप्रसंगांतील व्यक्तिरेखांचे हावभाव, त्याप्रमाणे देहबोली यांतून त्यांनी ती कथा जिवंत केली. सुरेख वातावरण- निर्मिती केली. विद्यार्थी नुसते हास्यकल्लोळात बुडून गेले. एक लेखक आणि कथनकार म्हणून शंकर पाटील यांची ताकद लक्षात आली.

व्यंकटेश माडगूळकर, द. मा. मिरासदार आणि शंकर पाटील यांचे कथाकथन अवघ्या महाराष्ट्रात लोकप्रिय झाले होते. नवोदित ग्रामीण तरुण लेखकांची पिढी त्यांच्या कथाकथनाचे अनुकरण करू पाहत होती. कथालेखनातदेखील या त्रयीच्या लेखनशैलीचे अनुकरण ती करीत होती. या सर्वांतून या त्रयीचे कथालेखनावरील प्रभुत्व लक्षात येते.

शंकर पाटील यांचे मराठी ग्रामीण साहित्याला लाभलेले योगदान माहीत करून घ्यायचे असल्यास सर्वप्रथम त्या काळातील मराठी ग्रामीण साहित्याची

पार्श्वभूमी लक्षात घ्यावी लागते.

भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या आंदोलनात महात्मा गांधीजींनी 'खेड्याकडे चला' अशी हाक भारतीय जनतेला दिली. तेच ते लेखन करून कंटाळलेले, नागरी जीवन जगणारे मराठी लेखक नव्या आशय-विषयाच्या शोधात होते. महात्मा गांधीजींच्या या हाकेमुळे त्यांचेही लक्ष खेड्याकडे गेले आणि आपल्या साहित्यनिर्मितीसाठी ग्रामीण जीवन हा एक नवीन विषय त्यांना मिळाला. ते खेड्यामधील आपले बालपण, आठवणी साहित्यातून रेखाटू लागले. त्यांचे अनुकरण करीत इतर लेखकही खेड्यातील निसर्ग, तेथील रोमांचक वातावरण, तेथील सुंदर ललना असे वर्णन आपल्या ग्रामीण कथा-कवितेतून करू लागले. मराठी ग्रामीण साहित्याची ही सुरुवात म्हणावी लागते.

१९४५च्या सुमारास दुसऱ्या महायुद्धातील अणुबॉम्बचा वापर आणि त्यामुळे घडलेला संहार यांनी जागतिक पातळीवरील साहित्याचे स्वरूप बदलून टाकले. साहित्यामध्ये वास्तववाद, अतिवास्तववाद आला. याचे प्रतिबिंब मराठी साहित्यात देखील पडले. बा. सी. मर्ढेकर यांच्या प्रेरणेतून नवसाहित्य निर्माण झाले. ग्रामीण साहित्याचे स्वरूपदेखील यामुळे बदलले. व्यंकटेश माडगूळकर, द. मा. मिरासदार आणि शंकर पाटील यांच्या साहित्यातून अस्सल ग्रामीण जीवनाचे चित्रण येऊ लागले. या त्रयीमुळे मराठी ग्रामीण साहित्याचा वास्तववादी प्रवाह जोमाने खळखळू लागला. व्यंकटेश माडगूळकर यांनी ग्रामीण जीवन, तेथील भयाण दारिद्र्य, तेथील माणसं, त्यांचे जीवन, कारुण्य आपल्या साहित्यातून रेखाटले. द. मा. मिरासदार यांनी ग्रामीण भागातील गमतीशीर घटना, त्या घटना-प्रसंगांतील बेरकी माणसं, त्यांचे विसंगतीपूर्ण जगणे नाट्यमय मिश्कील शैलीतून रेखाटले. शंकर पाटील यांनी ग्रामीण भागातील माणसांचे मनोविश्लेषणात्मक चित्रण प्रामुख्याने आपल्या कथांमधून केले. या त्रयीच्या साहित्यात अशा वेगवेगळ्या छटा प्रामुख्याने दिसून येतात.

शंकर पाटील हे कोल्हापूर जिल्ह्यातील. त्यांचे शिक्षण गडहिंग्लज आणि इचलकरंजी येथे झाले. सुरुवातीच्या काळात त्यांनी शाळेमध्ये अध्यापकाची नोकरी स्वीकारली. नंतर ते आकाशवाणीच्या पुणे केंद्रावर कार्यक्रम सहायक अधिकारी म्हणून काम पाहू लागले. माझे वडील आनंद यादव हेही सुरुवातीच्या

काळात आकाशवाणी पुणे केंद्रावर नवीनच रुजू झाले. शंकर पाटील यांच्या समवेतची तेव्हाची एक आठवण ते नेहमी सांगत. कोल्हापुरातून आलेल्या आनंद यादव यांना पुणे शहर नवीन होते. आकाशवाणीवरील काम संपले, की ते तिथून बाहेर पडत. रस्त्याने चालत असताना एक स्त्री आपल्या लहान मुलासह त्यांच्यापुढे हात पसरून पोटासाठी पैसे द्या म्हणून विनवणी करी. खेड्यातून आलेले आनंद यादव तिचे हे दीनवाणे जगणे पाहून कळवळून जात आणि तिच्या हातावर पैसे ठेवत. त्यांचा हा रोजचा दिनक्रम झालेला. एक दिवस आनंद यादव यांच्यासोबत शंकर पाटीलदेखील होते. बाई समोर आल्यावर यादव यांनी पाकिटातून पैसे काढले आणि तिला दिले.

तेव्हा शंकर पाटील म्हणाले, ''यादव, हे तुम्ही काय करत आहात?''

''अहो, बाई गरीब दिसते. तिला लहान मूल आहे. पोटापाण्यासाठी देतो तिला पैसे.'' यादव उद्‌गारले.

त्यावर शंकर पाटील हसले आणि म्हणाले, ''यादव, तुम्ही पुण्यामध्ये नवीन आहात. ही माणसं असं दीनवाणं रूप घेऊन भीक मागून पैसे मिळवतात आणि नंतर चैन करत बसतात. ते खरोखरचे भिकारी नाहीत.'' यादव यांना लवकरच शंकर पाटील यांच्या बोलण्याचा प्रत्यय आला.

त्या काळात शंकर पाटील यांच्यासमवेत फिरताना, गप्पा करताना 'मला हळूहळू पुणे शहर माहीत होत गेले,' असे बाबा अनेक वेळा सांगत.

१९८० च्या सुमारास वर्तमानपत्रांमध्ये 'कथा अकलेच्या कांद्याची', 'लवंगी मिरची कोल्हापूरची' या वगनाट्यांच्या नेहमी जाहिराती असत. शंकर पाटील यांची ही वगनाट्ये तेव्हा अतिशय लोकप्रिय झाली. तमाम रसिकांनी ती डोक्यावर घेतली. 'पिंजरा', 'एक गाव बारा भानगडी', 'केला इशारा जाता जाता', 'डोंगरची मैना' अशा अनेक चित्रपटांचे कथा-पटकथालेखन शंकर पाटील यांनी केले. ग्रामीण पार्श्वभूमी असणारे हे चित्रपट आजही लोक आवडीने यूट्यूब, नेट फ्लिक्सद्वारे पाहत असतात. या सर्व चित्रपटांची ताकद प्रामुख्याने त्यांच्या दमदार, ग्रामीण पार्श्वभूमीच्या कथानकात आहे. या कथांतील नाट्य रसिकांना मोहवून टाकते.

शंकर पाटील हे स्वत: 'पट्टणकोडोली' या कोल्हापूर जिल्ह्यातील खेड्यात वाढल्यामुळे त्यांच्या मूळ स्वभावातच साहित्यिक नजर, ग्रामीण बाज, खटकेबाज संवाद हे विशेष गुण दिसतात. त्यांनी अनेक घटना व घडामोडी आपल्या हृदयात टिपून घेतलेल्या दिसतात. पुढील काळात ते शहरात सुमारे वीस-

पंचवीस वर्षे वास्तव्य करून असले तरी त्यांनी ग्रामीण कथा लिहिली. याचे कारण ते सांगतात की, माझ्या बालपणात मी जे विश्व अनुभवले ते अतिशय तीव्रतेने आणि रसरसून जगलो आहे. त्यामुळे माझ्या कलानिर्मितीतील अनुभवांच्या मांडणीत तेच येते. ते मला उत्कटतेने जवळचे वाटते. त्यामुळे मला कथा सुचली, की माझ्या मनाच्या स्टुडिओमध्ये ग्रामीणतेचेच सेटिंग उभे राहते आणि माझी कथा ग्रामीण होते. त्यांचे चौथीपर्यंतचे शिक्षण तारदाळला झाले आणि आपल्या बहुतेक कथांमधील वातावरण हे तारदाळचेच आहे, असे ते आवर्जून सांगत. त्यांना ग्रामीण ढंगाची बोली भाषा अवगत झाली. त्यांनी ग्रामीण माणसाचे मन, त्याचा भाबडा स्वभाव, श्रद्धा चिकित्सक रीतीने जाणून घेतले. त्यामागील त्या माणसाचे जीवनतत्त्वज्ञान ते जाणून असत.

'तक्रार' या त्यांच्या कथेतील हा एक प्रसंग.

माझ्या मागोमाग हा बंडाचा 'बा' दरवाज्यातून खाली वाकून बेताने आत आला. थेट खोलीत येऊन त्यानं बसकण मारली. तरी 'बंडा' कोण? त्याचं आडनाव काय? तो कोणत्या वर्गात आहे-या कशाचंच कोडं उलगडत नव्हतं. ते उलगडावं म्हणून मी विचारलं, ''आमच्या शाळेत बंडा आणि आहेत, तेव्हा आपला कोण म्हणता?''

पटक्याच्या बुट्टीतील चंची बाहेर काढत त्यानं कोडं उलगडलं- ''अहो बंड्या कोळी! कोळ्याचा बंडा हो मास्तर. आला का ध्यानात?''

''बरं, का येणं केलंय आपण?''

''तक्राद! तक्राद घेऊन आलोय. आणि कशाला यावं?'' असं म्हणून त्यानं चंचीतला सारा सराजमा बाहेर काढून बुद्धिबळाचा पट मांडावा तसा तो मांडू लागला. कात, चुना, पान, तंबाखू हे सारे जिन्नस त्यानं ऐसपैस मांडले आणि मी गडबड करून म्हणालो,

''बरं, काय तक्रार आहे बोला.''

''त्यात बोलायचं काय! ते तुम्हाला ठावं हैच की.''

शंकर पाटील आपल्या कथांमधून असे साधे साधे प्रसंग खुलवतात. नाट्य आणत त्याचे चित्रमय वर्णन करतात. तो प्रसंग जसाच्या तसा वाचकांसमोर उभा करतात. ग्रामीण बोली भाषेमुळे या प्रसंगात जिवंतपणा येतो. वाचकाला कथा पुढे वाचण्याची उत्सुकता लागते.

पाटील यांच्या अतिशय लोकप्रिय झालेल्या 'धिंड' कथेतील राऊ खोत

काय किंवा 'तक्रार' कथेतील बंडाचा बाप काय; कथेच्या सुरुवातीला ही सरळ, साधी, भाबडी माणसं वाटतात; पण जसजशी कथा वाचत जातो तसा यांचा धूर्तपणा आणि बेरकीपणा लक्षात येत जातो, आणि वाचकाच्या चेहऱ्यावर हास्य फुलू लागते; किंबहुना उसळू लागते. या व्यक्तिरेखांचे खुमासदार, हजरजबाबी संवाद, स्वतःची बाजू सावरण्याचे बेरकी प्रयत्न शंकर पाटील मिश्कीलपणे कथेतून उलगडत जातात आणि वाचकांचे मनोरंजन होऊ लागते.

पाटील यांच्या या विनोदी कथा लोकप्रिय आहेतच; पण त्यांनी खेड्यातील सामान्य माणसाचे जीवन उलगडणाऱ्या गंभीर कथाही ताकदीने लिहिल्या आहेत. 'वळीव', 'ऊन', 'निचरा', 'पात', 'सारवण', 'भुजंग' अशा त्यांच्या कथा सहजपणे आठवतात. पाटील यांना घटनांपेक्षाही व्यक्तिमनांची आंदोलने महत्त्वाची वाटतात. ते आपल्या कथांमधून पात्राची मानसिक अवस्था निसर्गाच्याद्वारे प्रकट करतात. निसर्गाचा वैशिष्ट्यपूर्ण वापर त्यांच्या कथांमध्ये दिसून येतो. या कथांमधून पाटील यांचा खेड्यातील सामान्य माणसाविषयीचा कळवळा दिसून येतो.

कलावंत व्यक्ती ही मूलत:च कलावंत असते. जीवनातल्या प्रत्येक क्षणी या व्यक्तीच्या मनातील कलावंत जागा असतो. शंकर पाटील यांनी त्यांच्या 'भूल' कथेच्या निर्मितीविषयी एक घटना सांगितली आहे. भाऊ आजारी आहे, अशी तार मिळाल्यावर त्यांना भावाविषयी काळजी वाटू लागली आणि ते गावी जाण्यासाठी रेल्वेत बसले. या प्रवासात त्यांना एका कथेचा विषय सुचला आणि भावाविषयी काळजी करण्याऐवजी ते आपल्या कथेचा विचार करू लागले.

शंकर पाटील यांनी आपल्या अनेक कथांमधून ग्रामीण स्त्रीचे व्यक्तिमत्त्व समर्थपणे तिच्या विविध परिमाणांसह मनोविश्लेषणावर लक्ष केंद्रित करत प्रकट केले आहे.

'भुजंग', 'वेणा' या त्यांच्या कथांची साहित्यविश्वात मोठी चर्चा झाली. या कथा आगळ्यावेगळ्या आणि शंकर पाटील यांच्या प्रतिभेची उत्तुंग झेप प्रकट करणाऱ्या आहेत. 'भुजंग' मधील साप हा जनाईचा सतत पाठलाग करत आहे. त्याच्या भयाने सबंध कुटुंबच ग्रस्त झाले आहे. एकीकडे भुजंग आणि दुसरीकडे वेडसर नवरा यांच्या कचाट्यात जनाई सापडली आहे. त्यामुळे हा वास्तवातला भुजंग नसून, ती अटळ नियती आहे, ती वेडसर नवरा असणाऱ्या

जनाईच्या मनातील कामगंडाचे रूप आहे, अशी वेगवेगळी मते या कथेवर मांडली गेली आहेत.

'वेणा' कथेमध्ये पाटील यांनी स्त्रीच्या प्रसूती समयीच्या वेदनेचा नि:संकोचपणे वेध घेतला आहे. तिची प्रसूतीच्या क्षणीची अवस्था आणि प्रसूतीनंतर तिला वाटू लागलेली मुक्तता यांचा उत्कट प्रत्यय ही कथा देते. या कथेवर त्या काळात मोठी टीका झाली होती.

शंकर पाटील यांच्या 'टारफुला' या मोठ्या, सुमारे तीनशे पानांच्या कादंबरीने मराठी साहित्य विश्वावर गारूड केलं. या कादंबरीत पाटील यांनी खेड्यातील पाटलाच्या तीन पिढ्यांची कहाणी सांगितली आहे. ही केवळ पाटलाची कहाणी राहत नाही, तर ती त्या संपूर्ण गावाची, गावावर येणाऱ्या अस्मानी-सुलतानी संकटांची, तिथल्या बदलत गेलेल्या वातावरणाची, तिथल्या अनेक माणसांची, त्यांच्या जीवनाची, तेथील निसर्ग, सण, उत्सव, कृषी संस्कृती या सर्वांची आहे. पित्याप्रमाणे गावाची काळजी घेणारा दिलदार पाटील ते गाव आपल्या उपभोगासाठीच आहे, असे मानणाऱ्या तिसऱ्या पिढीतील क्रूर पाटील हा बदल शंकर पाटील यांनी रेखाटला आहे. या सर्व पाटलांचे मनोविश्व, त्यांची बदलत गेलेली मानसिकता आणि तसे कारणीभूत असलेले वातावरण पाटील यांनी रेखाटले आहे. या कादंबरीतील नाट्य, संघर्ष पाटील यांनी आपल्या प्रतिभाशाली लेखणीने खुलवला आहे. निसर्ग, ऋतू आणि ऋतुमानानुसार कृषिकर्म यांचे वर्णन वाचताना वाचकाचे मन मोहून जाते. स्वातंत्र्यपूर्व काळातील खेडे या कादंबरीत येते.

शंकर पाटील यांनी आपल्या साहित्यनिर्मितीद्वारे मराठी साहित्यविश्व समृद्ध केले आहे. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांतील कलात्मकता, सौंदर्य वेधक आहे. ग्रामीण भागांतील वास्तव त्यांच्या कथा-कादंबऱ्यांतून वाचकांसमोर उभे राहते. कथानकापेक्षाही व्यक्तिरेखांचे मनोविश्लेषण हा शंकर पाटील यांच्या लेखनाचा गाभा दिसतो. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांतील नाट्य आणि संघर्ष वाचकाला मंत्रमुग्ध करतात. या प्रतिभाशाली लेखकाची आठ ऑगस्टला जयंती होती.

त्यांना मनापासून अभिवादन.

– कीर्ती मुळीक

◆

पुस्तकाच्या पानांतून



इथे थबकली गंगामाई

मनोहर माळगांवकर

अनुवाद

श्री. ज. जोशी

पन्नास वर्षांहून अधिक काळ वाचकांना मोहित करणारी मनोहर माळगांवकर यांची अभिजात साहित्यकृती... संक्रमणावस्थेत असलेल्या राष्ट्राची महाकथा...

खूप मोठी होळी पेटली होती आणि त्यात विदेशी कपडे जळत होते. त्या दिवसांत बाजारपेठेतील चौकात अशा होळ्या प्रत्यही धडधडत असत. होळीच्या एका बाजूला उंच व्यासपीठ होते. त्याच्या पार्श्वभूमीवर चरखांकित तिरंगी निशाण फडफडत होते. व्यासपीठावर खादीच्या चादरी अंथरलेल्या होत्या. खादीच्या पांढऱ्या टोप्या घातलेले, गंभीर दिसणारे दहा-बारा लोक एक वर्तुळ करून बसले होते. त्यांच्या मध्यभागी काळसर वर्णाचा, दुबळ्या शरीरयष्टीचा त्यांचा पुढारी बसलेला दिसत होता.

बाजारपेठेत खूप गर्दी होती; परंतु बरेचसे लोक सभास्थानापासून दूरदूरच उभे होते. आपण गांधींचे अनुयायी आहोत. ब्रिटिश सरकारबरोबर

असहकारितेचा लढा उभारणाऱ्यांपैकी एक आहोत, अशी कबुली द्यायची त्यांची तयारी नव्हती. पोलीस-शिपाई ठिकठिकाणी विखरून उभे होते. बहुतेक सर्व मोक्याच्या जागा त्यांनी अडवल्या होत्या. हातांतल्या लाठ्या जमिनीवर आपटून ते प्रेक्षकांमध्ये भय निर्माण करीत होते. शाळा-कॉलेजातल्या विद्यार्थ्यांनी मात्र होळीभोवती फेर धरला होता. घोषणांचे आवाज घुमत होते... 'ब्रिटिश-विलायती-विदेशी मालावर बहिष्कार!' 'महात्मा गांधी की जय!' 'महात्मा गांधी झिंदाबाद!'

'ग्यान तलवार' गर्दीच्या मागच्या बाजूला उभा राहून धडधडत्या होळीकडे आणि व्यासपीठावरील माणसांकडे बघत होता. ते महात्मा गांधी आहेत, हे त्याने ताबडतोब ओळखले! ग्यानच्या दृष्टीने सध्या सुरू झालेली चळवळ फार प्रचंड होती. अनेक वर्षे तो महात्मा गांधींचे नाव ऐकत होता. प्रत्येक भारतीयाचा स्वाभिमान महात्माजींनी जागृत केला आहे- 'सत्य आणि अहिंसा' यांचे गांधीजी म्हणजे प्रतीक आहेत, असे त्याचे मत होते. गेली कित्येक वर्षे तो गांधींची मानसपूजा बांधत होता.

शेवटी आज त्यांचे दर्शन घडले!

गांधीजी सूत कातत होते. उजव्या हाताने ते टकळी फिरवीत होते आणि डाव्या हाताने सुताचा धागा ताणला जात होता. त्यांची दृष्टी टकळीवरून श्रोत्यांकडे व श्रोत्यांकडून टकळीकडे आळीपाळीने फिरत होती. सूत कातताना त्यांची मान पुढे-मागे होत होती. व्यासपीठावरील इतर पुढाऱ्यांइतके ते गंभीर दिसत नव्हते. त्यांचे डोळे लकाकत असल्यासारखे वाटत होते. जवळच होळी पेटलेली होती. तिच्या ज्वालांमुळे त्यांचे डोळे तसे दिसत असावेत.

तो सोमवार होता. गांधीजींचे मौन होते. तसे नसते तर त्यांनी नक्कीच छोटेसे भाषण केले असते. गांधींच्या मौनामुळे त्यांच्या परिवारातील एका देखण्या, कृश शरीराच्या, स्वप्नाळू व भावगर्भ डोळ्यांच्या तरुणास व्याख्यान देण्यासाठी पुढे व्हावे लागले. त्याने इंग्रजीत वक्तव्य केले. त्याची भाषा सफाईदार होती आणि उच्चार अस्सल इंग्रजांप्रमाणे होते.

''बंधूंनो आणि भगिनींनो! खरे तर आज तुम्हाला 'सैनिक' म्हणून संबोधण्याची जरूर आहे. भारताच्या मुक्ततेसाठी आपले सैन्य खडे आहे. ब्रिटिशांपासून आपल्या मातृभूमीला स्वतंत्र करणे हे आपले ध्येय आहे. विजय प्राप्त होईपर्यंत हा लढा असाच चालणार आहे.

''आपण सैनिक आहोत, पण ते निराळ्या प्रकारचे! सत्य आणि अहिंसा

ही आपली दोन आयुधे आहेत. आपला लढा शांततेनेच लढवायचा आहे. गांधीजींनी आपणास रस्ता दाखवला आहे. आपल्या मार्गाबद्दल, आपल्या आयुधांबद्दल कोणत्याही तऱ्हेचा संभ्रम मनात बाळगू नका. आपली शूरांची अहिंसा आहे. तिचा जन्म भीरुतेतून झालेला नसून धैर्यापासून झालेला आहे. नेहमीच्या लढाईतल्या सैनिकांना जेवढा त्याग करावा लागतो त्यापेक्षा जास्त मोठा त्याग आपणास करावा लागेल. आपल्या देशात अहिंसेवर विश्वास न ठेवणारे अनेकजण आहेत. पिस्तुलांच्या आणि बॉम्बगोळ्यांच्या साहाय्याने स्वातंत्र्य मिळेल, असं त्यांना वाटतं. ते लोक कितीही देशभक्त असले तरी आपल्या चळवळीत त्यांना स्थान नाही.''

टकळीवर कातल्या जाणाऱ्या सुताचा धागा एकदम तुटला. गांधीजींनी मधले बोट तोंडात घालून ते ओलसर केले आणि त्याच्या साह्याने तुटलेला धागा एकसंध केला. त्यांनी वर बघितलेही नाही. सूत कातणे चालूच राहिले.

''आज आपण येथे कशासाठी जमलो आहोत, हे प्रत्येकाला माहीत आहे.'' त्या तरुणाचे भाषण पुढे सुरू राहिले. ''आपले काही देशबांधव परकीय राज्यसत्तेला विरोध करण्याऐवजी तिच्या जोखडाखाली राहण्यातच समाधान मानतात. गोऱ्या लोकांची हांजी हांजी करून त्यांची नक्कल करण्यात त्यांना धन्यता वाटते. ते परदेशी कपडे वापरतात. ज्या देशाने आपल्याला गुलामगिरीत खितपत ठेवले आहे, त्या देशाला ही मंडळी अशा तऱ्हेने साह्य करतात. त्यांचा धि:कार करावा तेवढा थोडाच आहे. विलायती मालावर बहिष्कार घालून आणि स्वदेशीचे व्रत घेऊनच आपण आपल्या देशाची आर्थिक परिस्थिती सुधारू शकू. दारिद्र्याशी मुकाबला करण्याचा तोच एकमेव मार्ग आहे.

''ब्रिटिश सरकार या देशावर राज्य करण्यासाठी गोरे सनदी नोकर पाठविते. त्यांचा पगार कोण देतो? या देशातील स्वातंत्र्याच्या चळवळींना पायाखाली चिरडण्यासाठी गोऱ्या सोजिरांच्या हातात बंदुका आणि बायनेट कोण देते? या सभेभोवती मुजोर पोलिसांचे कडे पडलेले आहे. त्यांना कोण पोसते?... ब्रिटिश माल वापरणारे आपले देशबांधवच या सर्व गोष्टींच्या मुळाशी आहेत. आपल्या मित्रांना आणि कुटुंबीयांना विलायती मालावर बहिष्कार घालण्यासाठी आपण प्रवृत्त करावयास हवे. विलायती माल वापरताना आपल्याला लाज वाटायला हवी. यापुढे चौकाचौकांतून असल्या होळ्या व्हायला हव्यात. ही आग आता भडकलेली आहे. लोकहो, पुढे या! साहेबी टोप्या, विलायती कापडाचे शर्ट आणि कोट, रंगीबेरंगी गळपट्ट्या या होळीमध्ये टाकून तिच्या ज्वाला अधिकच

भडकवा. या आगीने आपल्यातील हीन ते जळून जाईल. सत्य आणि अहिंसा यांना विघातक असे जे काही आपल्यात असेल ते या आगीत नष्ट होईल; पण लक्षात ठेवा, हे सर्व करताना आपणास कोणावरही जुलूम, जबरदस्ती करावयाची नाही. धाकदपटशा दाखवायचा नाही. शांततेच्या मार्गाने आपणास क्रांती करावयाची आहे.

''ब्रिटिश मालावर बहिष्कार! ही घोषणा म्हणजे त्या अपूर्व क्रांतीचा संदेशच आहे. जे लोक अजून मागे मागे आहेत, या चळवळीबद्दल ज्यांच्या मनामध्ये अजून संदेह आहे, त्यांनी आज पुढे यायला हवे. आपण निर्भय बनू या. पोलिसांना कशाला घाबरायचं? पोलिसांची भीती ही आपल्या गुलामगिरीची द्योतक नव्हे काय? स्वतंत्र देशात पोलीस हे लोकांचे नोकर असतात. आपल्या देशात मात्र परकीय सरकारचे कायदे जनतेवर निष्ठुरपणे लादण्यासाठी त्यांचा उपयोग करण्यात येतो. आता यज्ञकुंड पेटले आहे. आपण आहुती द्यायला हवी. स्वातंत्र्याची ज्योत झगमगत असताना पोलिसांच्या भीतीने आपण मागे राहिलो, असा दोषारोप आपल्यावर यायला नको.

''अहिंसेचे व्रत भित्र्यांसाठी नाही. आज या अग्नीत ज्याप्रमाणे आपण परदेशी कपडे टाकत आहोत, त्याचप्रमाणे 'अहिंसे'ला विरोध असणाऱ्या सर्व प्रवृत्तीही जाळून टाकायला हव्यात.

''महात्मा गांधी की जय!''

त्याने दोन्ही हात जोडून लोकांना वंदन केले आणि तो महात्मा गांधींच्या उजव्या हाताला त्याच्या ठरलेल्या जागी जाऊन बसला. गांधींनी एक क्षणभरच सूतकताई बंद ठेवली आणि उजव्या हाताने त्याच्या खांद्यावर थोपटले.

'ग्यान तलवार' भाषण ऐकता ऐकता स्वत:लाच विसरून गेला होता. 'महात्मा गांधी की जय!' 'अहिंसा अमर रहे' आदी घोषणा ग्यानच्या न कळतच त्याच्या तोंडून बाहेर पडल्या. अंगावरील निळसर रंगाचा ब्लेझरचा कोट काढून त्याने हातावर घेतला. कॉलेजच्या फुटबॉल टीमचे निदर्शक पिवळे फूल त्या कोटाच्या कॉलरवर शिवलेले होते. त्याकडे त्याने एकदा बघितले आणि तो गर्दीतून होळीकडे निघाला.

ब्लेझरचा तो कोट फार सुंदर होता. ग्यानने तो छातीशी धरला होता. केसाळ गुबगुबीत सशाप्रमाणे त्या कोटाचा स्पर्श होता. क्षणभर त्याला वाटले की, एकदम मागे फिरावे - इतका सुंदर कोट अग्नीत टाकणे मूर्खपणाचे आहे! परंतु आता मागे फिरणे शक्य नव्हते. होळीभोवतालच्या जनसमूहाने त्याला

एव्हाना वाट करून दिली होती आणि त्याच्या नावाच्या घोषणा सुरू झाल्या होत्या. तो पुढे गेला आणि त्याने कोट धगधगत्या ज्वालांमध्ये भिरकावून दिला.

''शाब्बास! लोक ओरडले, वा रे वा पट्ठे!''

लोक स्वत: मात्र अजून पुढे येत नव्हते. ते एकमेकांकडे पाहत होते - दुसऱ्याने पुढे जावे अशी अपेक्षा करीत होते. आपआपसांत त्यांची कुजबुज चालली होती. तिचा आवाज चमत्कारिक वाटत होता... इतक्यात एक आश्चर्य घडले. जनसमूहातून एक स्त्री एकदम पुढे आली; त्यामुळे तिथे स्तब्धता पसरली. ती उंचीपुरी आणि श्यामलवर्णी होती. तिचा पोशाख तर इतका सुंदर होता की, तिची आकृती रंगीबेरंगी पक्ष्याप्रमाणे मनोहर दिसत होती. आकाशी रंगाच्या साडीवर तिने फरचा गुडघ्यापर्यंत लांबीचा, किंमती कोट परिधान केला होता. इकडेतिकडे न बघता ती थेट होळीजवळ गेली. एक क्षणभर ती अगदी नि:स्तब्ध उभी राहिली. तिचे मस्तक खाली झुकले होते. अग्निज्वालांच्या प्रकाशामध्ये तिची साडी, फरकोट व काळे-निळे केस निराळेच दिसत होते. मग तिने अंगातला कोट काढला आणि अग्नीला अर्पण केला.

जमावामध्ये एक क्षणभरच शांतता पसरली. मग एकदम स्फूर्ती आली. 'भारत माता की जय!' अशी घोषणा दुमदुमली आणि जमावातले लोक एकमेकांना मागे रेटून होळीजवळ गेले. आपापल्या अंगावरचे कोट, टोप्या आणि सदरे होळीत फेकण्याची त्यांच्यात जणू अहमहमिकाच लागली. 'महात्मा गांधी की जय!'... 'भारत माता की जय!' असे नारे तर एकसारखे झडत होते.

होळीजवळ उभ्या असलेल्या आणि ज्वालांमुळे तेज:पुंज दिसणाऱ्या त्या स्त्रीकडे बघून ग्यानच्या मनात कल्लोळ उठला. त्याला वाटले, ती साक्षात अग्निदेवताच आहे!... एक क्षणभर त्याने तिच्याकडे पाहिले आणि मग उसळत्या गर्दीमध्ये ती एकदम अदृश्य झाली... आपण तिला खरेच पाहिले की तो नुसताच भास होता! की सीतेप्रमाणे ती त्या प्रचंड ज्वालांमध्ये अंतर्धान पावली?... त्याला काहीच कळेना.

थोड्याच वेळात सभा संपली. गांधीजींनी टकळी बाजूला ठेवली आणि दोन्ही हात जोडून नमस्कार केला आणि ते उठले.

'महात्मा गांधी की जय!' स्वत:च्या न कळतच ग्यान घोषणा देत होता. 'भारत माता की जय!...' 'अहिंसेचा मार्ग भित्र्यांसाठी नाही,' या घोषणांचा आवाज त्याला प्रार्थना गीतासारखा वाटत होता.

◆

नवी संहिता... नवा आशय...

विमुक्तायन

लक्ष्मण माने

भटक्या-विमुक्तांचे मनाचा थरकाप उडविणारे, परिघाबाहेरचे जीवन, जात पंचायतीचे वाढते प्रस्थ, शासनाने केलेल्या उपाययोजना इ. भटक्या विमुक्तांच्या जीवनावर टाकलेला संशोधनात्मक प्रकाश

किंमत : ६६०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

उद्ध्वस्त



लक्ष्मण माने

मुलगा व्हावा या अट्टहासापायी एखादी उधळते जीवन...
तर अजाणतेपणाने लावून दिलेल्या लग्नाने एखादीची होते होरपळ...
तर भावंडांच्या शिक्षणासाठी एखादी स्वत:च्या जीवनाचा करते यज्ञ...
वास्तवतेचं परिमाण लाभलेल्या आणि हेलावून टाकणाऱ्या कथांचा संग्रह.

किंमत : २५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

पुस्तकाच्या पानांतून



अर्धनारी

पेरुमाल मुरुगन

अनुवाद

डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके

तथाकथित नैतिकतेला छेद देणारं लोकजीवनातलं धक्कातंत्र अलगद वाचकांपुढे सादर करणारी सशक्त कादंबरीमाला...

पारोशा पिंपळाची फांदी जिथे छाटली होती त्या भुंड्या भागाकडे काली टक लावून पाहत होता.

एखाद्या व्यक्तीचा हात खांद्यापासून उडवला तर तो भाग जसा थोटा दिसेल, तशीच ती झाडाची जागा दिसत होती. कुऱ्हाडीने झाडाच्या खोडावर झालेल्या खुणा कालीला अद्याप दिसत होत्या. माशांच्या खवल्यांसारख्या वाटल्या त्या त्याला. त्यानेच ती फांदी तोडली होती. त्याची आई त्याच्या इतकी मागे लागली होती, की वैतागून त्याला ती तोडावी लागली होती. झाडाची ती विशिष्ट फांदी त्याची फार लाडकी होती. ते झाड अतिशय प्रेमाने आपला एक हात त्याच्या दिशेने करत आहे, त्याला

मायेने आपल्यावर चढायला सांगत आहे, असं त्याला त्या फांदीकडे पाहून वाटत असे. उत्तेजित होत तो पट्कन उडी मारून ती फांदी पकडत असे. मग, हाताला कळा येईपर्यंत तो त्या फांदीवर झोके घेत राही. हात भरून आले, की मग छानसा झोका घेत, फांदी सोडून पाच-सहा फूट दूर उडी मारत असे. झाडाच्या सावलीत रवंथ करणारी गाय आणि बैल त्याच्याकडे चकित होऊन पाहत असत.

असंच एकदा त्याच्या मामाची मुलं कुठल्यातरी सणासाठी आली होती. त्यानेच त्या वेळेस त्या मुलांसाठी झोका बांधून दिला होता. जमिनीला टाचेने एक रेटा दिला की, त्या मुलांना मस्त मोठा झोका घेता येत होता. त्यांना कशाचाही अडथळा नव्हता. ती फांदी चांगली मजबूत होती, एखाद्या कुस्तीगिराच्या दणकट दंडांसारखी. मुलांनी कितीही जोरात झोका घेतला तरी फांदी मोडेल किंवा तुटेल याची भीतीच नव्हती. सरतेशेवटी, नेमकी तीच फांदी छाटावी लागली याचं कालीला अतोनात दु:ख झालं होतं. त्याला ती छाटावीच लागली, कारण त्याच्या आईने तसा हट्टच धरला होता. खरं म्हणजे ते झाडच उखडून टाकायची तिची इच्छा होती; पण त्याने तिला इतका तीव्र विरोध केला की, शेवटी तिला एक फांदी छाटण्यावरच समाधान मानावं लागलं.

अत्यंत त्रासदायक मन:स्थितीत त्या दिवशी त्याने जेव्हा त्या फांदीकडे पाहिलं तेव्हा जणू ती फांदी त्याला पुकारते आहे, असं त्याला वाटलं. मुळातच, तो अशा स्थितीत पोहोचला होता जिथे त्याच्यासमोर मृत्यू हा एकच उपाय उरला होता. अन्यथा, त्याला आयुष्यात एक पाऊलही पुढे टाकणं अशक्य झालं होतं. किती विपरीत परिस्थिती होती ती! एका माणसाला मूर्ख बनवण्यासाठी किती लोकांनी एकत्र येऊन कट केला होता! त्याची आई, सासू, सासरा, मेहुणा, पोन्ना. इतर सर्वांनी त्या योजनेला अनुमती दिली असली तरी पोन्नाने ती कशी दिली? दुसऱ्या एखाद्या पुरुषाबरोबर झोपण्याची तिची आंतरिक इच्छा नसती तर तिने त्या योजनेला संमती दिलीच नसती. विळ्याने तिचंच मुंडकं छाटून टाकावं, हा पहिला विचार त्याच्या मनात आला, इतका तो संतापला होता. परंतु, तसं त्याने केलं असतं तर तिचं मस्तकविहीन धड क्षणभर थरथरलं असतं, क्षणभर त्या शरीराला वेदना असह्य झाल्या असत्या आणि तिचा मृत्यू झाला असता. उलट, बायकोचा खून केल्याचा ठपका कालीला आयुष्यभर वागवावा लागला असता. त्यामुळे, तसं करून चालणार

नव्हतं. तिने जे काही केलं त्याबद्दल उर्वरित आयुष्य तिने पश्चात्तापाच्या आगीत होरपळतच काढायला हवं होतं. म्हणूनच तो या निष्कर्षाला आला की, तो जर मेला तर तिच्यासाठी ती अगदी योग्य शिक्षा ठरेल.

आपण मेलो तर आपल्या स्वत:चाही छळवाद थांबेल, असं त्याच्या मनात आलं. पोन्नाचा विचार मनात येऊन तो मोठ्यांदा म्हणाला,''तू आयुष्यभर तडफडली पाहिजेस.'' बराच वेळ तो हे एकच वाक्य वारंवार म्हणत राहिला. त्याने दातओठ खाल्ले. ते वाक्य पुन्हा पुन्हा उच्चारलं. संतापाने त्याचा नुसता थयथयाट होत होता. मक्याचा कडबा बांधून ठेवलेली दोरी त्याने सोडवून आणली. त्या दोरीच्या लांबीचा अंदाज घेतला. जुनी होती ती दोरी, पण तिला अनेक मजबूत पीळ होते जे कधीच तुटले नसते. त्याने ती दोरी उचलली आणि फांदीवर टाकली. एखाद्या सापासारखी ती तिथे लोंबकळू लागली. दोरीचं दुसरं टोक ओढत त्याने फास तयार केला. मग त्याच्या लक्षात आलं, की आपली निष्ठुर योजना खरोखरच अमलात आणायची असेल तर पायाखाली काहीतरी आधार लागेल. 'काय बरं घ्यावं' अशा विचारात त्याने अवतीभोवती पाहिलं. त्याला एक मोठं डालं दिसलं. कोंबडीच्या पिल्लांवर ते उपडं घातलं होतं. त्याने ते उचलताच आतली पिल्लं कलकलाट करत चारी दिशांनी सैरावैरा पळाली.

अजून पहाट झाली नव्हती. प्रकाश फारच अंधूक होता. आजूबाजूच्या वस्तू जेमतेम दिसत होत्या. तशा त्या अंधारातच कोंबडीची पिल्लं इकडे तिकडे पळू लागली. कालीने ते डालं त्या लटकणाऱ्या दोरीखाली टाकलं. आता तर कोंबडीच्या पिल्लांचा कलकलाट अजूनच वाढला. अजून उजाडायचं होतं. त्याची आई 'सीरायी' या वेळेस खेड्यातल्या तिच्या घराकडून शेताच्या दिशेने निघाली होती. काली घरी नसल्यामुळे गोठ्यातली स्वच्छता उरकून घ्यावी, असा तिचा विचार होता. गावातल्या चिंचेच्या झाडावरच्या कावळ्यांची 'काव काव' ऐकू येताच ती नेहमीपेक्षा लवकरच उठली होती. आता ती शेताच्या जवळ आली. तितक्यात, तिला कोंबडीच्या पिलांचा कलकलाट ऐकू आला. एखादी रानमांजर त्यांची शिकार करायला आली असणार, या विचाराने 'सीरायी' पुढे धावली. जे कोणी गोठ्यात घुसलं असेल त्याला तिथून घालवून द्यायला तिने आरडाओरड करायला सुरुवात केली. तितक्यात तिला दिसलं की, तिथलं फाटक सताड उघडं होतं. तिच्या मनात आलं, नक्की चोर

असणार! आदल्या रात्री आपण शेतातच झोपून सगळीकडे लक्ष ठेवायला हवं होतं, असं तिला वाटलं. तसं न केल्याने तिला स्वत:चाच राग आला. जशी ती फाटकातून आत धावली तसा तिला काली दिसला. सगळीकडे अंधार होता तरी समोरची आकृती कालीचीच आहे, हे ती ठामपणे सांगू शकली असती. पुढच्या क्षणी तिला उपडं घातलेलं डालं आणि वर लोंबकळणारी दोरी दिसली. नेमकं काय घडत आहे, हे तिला क्षणार्धात कळून चुकलं.

छाती बडवत, ''अरे देवा! माझं लाडकं लेकरू!'' असा आक्रोश करत ती त्याच्या दिशेने धावली. त्याने पायाने डालं उडवून टाकू नये, म्हणून तिने त्याचे पाय घट्ट पकडले. लोखंडी बेड्यांसारखीच तिची पकड होती. कालीला इंचभरसुद्धा हालता येईना. नेमक्या क्षणी ती आल्याचा त्याला इतका संताप आला की, तिच्या तावडीतून स्वत:ला सोडवण्यासाठी त्याने तिला लाथ घालण्याचा प्रयत्न केला. तो जोरात किंचाळला, ''सोड मला!'' परंतु, तिने आपली पकड जराही सैल होऊ दिली नाही. तिच्यासारख्या किरकोळ स्त्रीमध्ये इतकी अफाट ताकद कुठून आली, याचं त्याला नवल वाटलं. सापळ्यात अडकलेल्या उंदरासारखी त्याची स्थिती झाली. स्वत:ला किंचित शांत करत तो पुन्हा म्हणाला, ''सोड मला!''

'सीरायी' बेंबीच्या देठापासून ओरडली, ''इतकी वर्षं मी केवळ तुझ्यासाठी स्वत:ला जिवंत ठेवलं आहे. टांग मलाच त्या दोरीला! तू स्वत:ला संपवण्यापूर्वी मी कशी थरथरून मरते ते बघ जरा. या झाडाला भरपूर फांद्या आहेत. घे दुसऱ्या फांदीला टांगून स्वत:ला!''

तिच्या त्या त्राग्याने आणि याचनेने तो जरा ताळ्यावर आला. तो म्हणाला, ''अम्मा, ठीक आहे. मी मला काहीही करून घेणार नाही. काळजी नको करूस. सोड मला.'' अजूनही तो स्वत:ला तिच्या मगरमिठीतून सोडवण्याचा प्रयत्न करत होता.

ती म्हणाली, ''माझी शपथ घेऊन सांग, की तू स्वत:च्या जीवाचं बरं-वाईट करणार नाहीस.''

तो म्हणाला, ''तुझी शपथ.''

''देवी कूलिथायीला साक्ष ठेवून मला वचन दे.''

''देवी कूलिथायीला साक्ष ठेवून मी वचन देतो. सोड आता मला.''

एव्हाना त्याला काळजी वाटू लागली होती की, हे सगळं जर कोणाच्या

नजरेस पडलं तर त्याच्यावर फारच लाजिरवाणी परिस्थिती ओढवेल.

त्याला सोडत 'सीरायी'ने डालं ढकललं आणि ती जमिनीवर आडवी पडली. काली भानावर आला. त्याच्या लक्षात आलं की, त्या मोक्याच्या क्षणी ती येऊन धडकली नसती तर उगवणारी नवी लालसर पहाट तो पाहू शकला नसता.

मग तो गोठ्याच्या बाजूला ठेवलेल्या रांजणाच्या दिशेने गेला. रांजण अर्धा उरला आहे, हे त्याच्या लक्षात आलं. पाणी काढायला त्याला बरंच खाली वाकावं लागलं. आदल्या रात्री तो जर शेतात थांबला असता तर तिथली सगळी गाडगी-मडकी त्याने विहिरीचं पाणी उपसून भरून ठेवली असती. बाजूचा साबणाचा लहानसा तुकडा वापरून त्याने चेहरा स्वच्छ धुतला. माठातलं पाणी पिऊन तो तिथेच धापा टाकत बसला.

एव्हाना, 'सीरायी' उठून बसली होती. छाती बडवत तिने गायला सुरुवात केली;

पिकली आणि जीर्ण झाली तरी
ताडाची पानं चमकतात आणि बहरतात इथे
ताज्या टवटवीत पानाला मात्र निघून जावंसं वाटतं
मेलेली झाडं पुन्हा बहरतात इथे
ताज्या तरुण झाडांना स्वत:ला उखडून घ्यावंसं वाटतं
नेच्याच्या जुन्या झाडाची मुळं घट्ट धरतात मातीला
नवीन टवटवीत नेचा मात्र उन्मळून पडू पाहतो
पडझड झालेली झाडं ताठ उभी राहतात
तरतरीत झाड मात्र मरायला आतूर होतं

एव्हाना, मरण्याच्या इच्छेतून काली पूर्णपणे बाहेर आला होता. सभोवतालच्या जगाची त्याला लख्ख जाणीव झाली होती. त्याने कुंपणाकडे पाहिलं. तिथून जर कुणी चालत जात असेल, कुणी आपली गुरंढोरं बाहेर काढत असेल तर त्याच्या आईच्या तोंडचं हे शोकगीत नक्कीच ऐकू आलं असतं. मग, नेमकं काय घडलं आहे, हे जाणून घ्यायला ती व्यक्ती तिथे येऊन पोहोचली असती. झाडाला लटकणारा दोर दिसला असता तर काली स्वत:ला टांगून घ्यायचा

प्रयत्न करत होता, याची दवंडी त्याने गावात पिटली असती. तसं झालं असतं तर, आपण नेमकं का आणि काय करत होतो, याचं स्पष्टीकरण त्याला प्रत्येकाला देत बसावं लागलं असतं. जेमतेम एका क्षणात त्याचं नशीब बदललं होतं. क्षणभरापूर्वी संतापाने थयथयाट करणाऱ्या त्याच्या मनात आता केवळ शरम दाटून आली होती. तो ओरडून 'सीरायी'ला म्हणाला, ''मी अजून जिवंत आहे, आहे ना? मग? असली मरणाची गाणी कशाला म्हणते आहेस? जर कुणी ऐकलं तर काय होईल, याचा विचार करशील की नाही?''

बसल्या जागेवरून झटकन उठत 'सीरायी' त्याच्या दिशेने धावली. त्याचं मस्तक हातात धरत ती म्हणाली, ''अरे बाबा, स्वत:ला संपवण्याचा विचार करण्याइतकं तुझ्या आयुष्यात काय वाईट झालं आहे? शरम आणि सन्मानाच्या गोष्टी करतो आहेस आता, मला यायला जर क्षणभर उशीर झाला असता तर माझं उर्वरित आयुष्य मला अपमानास्पद रीतीने घालवावं लागलं असतं, याचा काही विचार केला होतास?''

हुंदके देत काली म्हणाला, ''तुम्ही सगळ्यांनी मिळून माझा अपमान करण्याचा कट रचला आहे. कशासाठी जगू मी आता? मी पुरुष आहे, याचा काय दावा करू मी या जगात आता?'' इतकं बोलून, तिच्यापासून दूर जात तो खाटेवर बसला.

त्याच्याजवळ जात प्रेमाने त्याचं डोकं कुरवाळत ती म्हणाली, ''माझ्या लहानग्या परमेश्वरा, अरे, अशा पद्धतीने विचार करू नकोस. हे तुझ्याच भल्यासाठी केलं आम्ही सगळ्यांनी. लहान आहेस अजून तू. तुझ्यासाठी भलंबुरं काय आहे, याची तुला जाण नाही. जे योग्य आहे ते करणं माझं काम आहे; तेच केलं मी!''

◆

पु स्त का च्या पा नां तू न



एकाकी सुगी

पेरुमाल मुरुगन

अनुवाद

डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके

तथाकथित नैतिकतेला छेद देणारं लोकजीवनातलं धक्कातंत्र अलगद वाचकांपुढे सादर करणारी सशक्त कादंबरीमाला...

पोन्नाने पारोशा पिंपळाकडे नजर टाकली. उजाडलं होतं. सगळीकडे प्रकाश विखुरण्याआधी किरणं झाडाच्या पानांवरून अलगद फिरत होती. पहाटेच्या त्या प्रकाशात ते झाड त्याच्या पर्णसंभारामुळे विशेष खुलून दिसत होतं.

कालीचा मृत्यू झाल्यानंतर जेव्हा पोन्ना झोपडीतून पाऊल टाकत असे तेव्हा सर्वप्रथम ते झाडच तिच्या नजरेला पडत असे. आताही नेहमीप्रमाणेच तिची नजर त्या विशिष्ट फांदीकडे गेली. एखाद्या भुंड्या हातासारखी दिसत होती ती जागा. खांद्यातून हात उचकटून काढल्यावर तो खांदा जसा दिसेल; अगदी तशी-करवतीने फांदी जिथे कापली होती तिथे गोलसर व्रणसुद्धा दिसत होता. दुसऱ्या बाजूने वाढणारा जणू हातच असावा, अशी ती फांदी

दिसत होती. पूर्वी, लहान मुलं या झाडावर चढायची तेव्हा, या फांदीवर नेहमी लटकायची. ती फांदी आळीपाळीने एकेका हाताने पकडत या टोकापासून त्या टोकापर्यंत जाणं हा मुलांचा आवडीचा खेळ होता. त्यानंतर, फांदी सोडून मुलं खाली उडी मारत.

जणूकाही, स्पर्धाच आहे अशा भावनेने काली उभं राहून, शरीर ताणत, एका उडीत फांदी गाठून त्यावर झोके घेऊ लागे. त्यानंतर तो खाली उडी मारे. त्याच्या त्या झोके घेण्यावरून ती त्याची नेहमी थट्टा करत म्हणे, 'म्हणतात ना, मूल नसलेल्या घरात म्हातारी मंडळीच खेळतात-बागडतात.' ती कालीची लाडकी फांदी होती. तो म्हणे, 'पाहा जरा, एखाद्या भल्या मोठ्या सापासारखी पसरली आहे ती.'

पोन्ना उत्तर देई, 'लक्ष ठेव, येईल एखाद दिवशी सरपटत आणि मारेल तुला डंख.'

परंतु, कालीचं त्या झाडावरचं प्रेम तसूभरही कमी झालं नव्हतं. तो म्हणे, 'लक्षात घे, या झाडाला कोणी कितीही छळा, मोठ्या संयमाने हे झाड सारं सोसतं. माणसांना मात्र एवढासाही त्रास सहन होत नाही.'

कालीच्या म्हणण्याप्रमाणे खरोखरच ते झाड सारं काही सोसत होतं. तो मात्र सोसू शकत नव्हता. कालीला आणि त्या वृक्षाला दोन वेगळ्या जीवांच्या रूपात पाहणं तिला कठीण जात होतं. म्हणूनच, तो वृक्ष पाडता कामा नये, यावर ती अतिशय ठाम होती.

त्या वृक्षापासून सुटका करून घ्यावी म्हणून अनेकांनी तिचं मन वळवण्याचा प्रयत्न केला होता. तिची सासू तर म्हणाली होती, 'तो तर गेला! नवरा गमावलायस, आता हे झाड कशाला हवं तुला?' तिच्याजवळ येत, तिच्या डोक्यावरून मायेने थोपटत तिच्या वडिलांनी म्हटलं होतं, 'जेव्हा, एखाद्या झाडाला लटकवून घेत कोणी मरतं, तेव्हा ते झाड आपण ठेवता कामा नये. ते झाड अधिकाधिक बळी मागत राहातं.' लोक असंही म्हणाले होते, 'त्याच्या आत्म्याला स्वर्गात शांती लाभणार नाही बरं. तो आत्मा येऊन या झाडावर बसेल आणि पछाडत राहील इथे सगळ्यांना.'

कोणी कितीही, काहीही म्हटलं तरी पोन्ना तिच्या निर्णयावर ठाम होती. त्या पारोशा पिंपळावर चढणाऱ्या कालीच्या आठवणी तिच्या मनात गच्च दाटल्या होत्या, हे कुणालाच ठाऊक नव्हतं. त्या वृक्षाच्या सावलीत असणारी खाट इतरांच्या दृष्टीने केवळ नारळाच्या काथ्यांची वीण होती, पण तिच्यासाठी

त्या काथ्या म्हणजे त्याच्याबरोबर घालवलेल्या अनेक सुंदर क्षणांच्या आठवणींची गुंफण होती. खरं तर, ज्या फांदीला लटकून त्याने फास घेतला होता ती फांदी तोडणंसुद्धा तिला मान्य नव्हतं. परंतु, तिला इतरांचं तेवढं तरी ऐकावंच लागलं. नाहीतर, तिला सगळं झाडच गमवावं लागलं असतं.

झाडाच्या दोन फांद्या दोन बाजूंना पसरल्या होत्या. त्यामुळे, त्या फार आतून कापणं शक्य झालं नव्हतं. म्हणूनच, खोडापासून फांदीचा थोडा भाग थोट्या हातासारखा दिसत होता. पडलेल्या त्या फांदीतून एक डहाळी उचलत तिने शेताच्या कोपऱ्यात खोलवर रोवली. जिथे कालीला जाळलं होतं तिथे ती एके दिवशी संध्याकाळी चालत गेली. तिची आई तिच्यामागून आरडाओरडा करत धावली. आईकडे लक्ष न देता तिने कालीच्या चितेतली राख उचलून आपल्या साडीच्या पदराच्या टोकाला बांधली. जिथे तिने ती डहाळी खोचली होती त्यातही तिने मूठभर राख टाकली. उरलेली सगळी राख तिने शेतात पसरली. 'सीरायी', तिची सासू, हे सारं पाहत होती. ती म्हणाली, ''मेलेल्या माणसाच्या आठवणीत हे झाड लावलंस तर त्याने तो परत येणारे का? वेडी झालीयेस तू! तो पारोसा पिंपळ आपल्याला छळतोय, हे पुरेसं नाही का? त्या झाडापायी सगळं शेत भरून टाकायची गरज आहे का?''

पोन्नाने खोचलेली ती डहाळी उपसून फेकत 'सीरायी' गाऊ लागली...

तिने रुजवलं रोपं, तिने रुजवलं रोपं
गेला अनंताच्या वाटे, त्वरे तो का परतेल?
साद घालेल का तो, 'मी सीरायीचा सूत,'
अन् जिवाला या माझ्या थोडा दिलासा देईल

तिने रोवली गं फांदी, तिने रोवली गं फांदी
गेला अनंताच्या वाटे, तो का उलटा गं धावी
साद घालेल का तो, 'मी गो पोन्नायीचा पती,'
अन् देईल का तो मना आनंदाची देणी...

मनाला आलं की 'सीरायी' असं एखादं शोकगीत सुरू करे. कधीकधी तर, ऐन मध्यरात्री तिचा आवाज सगळ्या गावाला जागं करे. दुसऱ्या दिवशी, कुणी गावकरी येऊन तिला भेट देई, तिचं सांत्वन करत म्हणे, 'तू केवळ अशी

शोकगीतं गाऊनच तुझं दु:ख कमी करू शकतेस. तुझ्या मनातून त्याची प्रतिमा दूर करणं फार कठीण आहे, नाही का?' कधीकधी, हे सारं पाहून पोन्नाला अगदी वीट येई, पण ती त्यावर काहीही बोलत नसे. तिने नवरा गमावला होता, तिचं दु:ख हे एका बायकोचं दु:ख होतं. 'सीरायी' मात्र दुहेरी दु:ख झेलत होती. आधी, तिने आपला नवरा गमावला होता आणि आता ज्या मुलाला तिने इतकं काळजीपूर्वक वाढवलं होतं, तो मुलगा तिला सोडून गेला होता.

त्या दुर्दैवी दिवशी, पोन्नाच्या कानांवर ती बातमी जाऊन तिने घरी धाव घेईपर्यंत, त्यांनी झाडाला लटकलेला दोर आधीच कापून टाकला होता. कालीचा निश्चेष्ट देह खाटेवर ठेवला होता. त्यावर पांढरं धोतर पसरलं होतं. पोन्नाला धरून ठेवण्याचा प्रयत्न करणाऱ्या अनेकांना हिसडा देत, स्वत:ला सोडवून घेत, ती त्या देहाच्या दिशेने धावली होती. ते पांढरं धोतर तिने खसकन ओढून बाजूला केलं होतं. ज्या पुरुषावर तिने मनस्वी प्रेम केलं होतं, त्याच्या चेहऱ्याकडे तिने पाहिलं होतं. तो काली नव्हताच. कुणीतरी वेगळाच होता. तिला अपरिचित असा कुणीतरी. त्याचे डोळे उपसून आले होते, त्या नजरेत धमकी होती. सुजलेल्या, चावा घेतलेल्या त्या जिभेवर वाळलेल्या रक्ताचे डाग दिसत होते. ओठ फाटले होते, सुजले होते. चेहऱ्यावरचे स्नायू जणू आपापल्या जागेवरून खाली ओघळल्यागत दिसत होते. त्यापायी, त्याचा चेहरा फारच विचित्र दिसत होता. त्याची शेंडी सुटली होती. आजवर असं भयाण रूप तिने कधीही पाहिलं नव्हतं. ज्या चेहऱ्यावर आपण मनस्वी प्रेम केलं, ज्याची उत्कट इच्छा सतत बाळगली तो हाच चेहरा आहे, यावर तिचा विश्वासच बसेना. 'अय्योऽऽऽ!' असं किंचाळत ती बेशुद्ध झाली होती.

पोन्नाला शुद्धीवर आणण्यासाठी दायीला बोलावण्यात आलं होतं. पोन्ना शुद्धीवर येईपर्यंत कालीचं अंतिम क्रियाकर्म करण्याची वेळ आली होती. ती किंचाळत राहिली, शेतातच खड्डा खणून कालीला तिथेच पुरावं, असं सगळ्यांना विनवत राहिली. परंतु, तिचा भाऊ मुथू पुढे येऊन म्हणाला होता, 'ऐक माझं, आपण असं नको करायला. शेताजवळ गेलीस, की प्रत्येक वेळेस त्याचाच विचार तुझ्या मनात येत राहील.' मुथूच्या गळ्यातल्या अंगोछाची दोन्ही टोकं ओढून तिने त्याच्या चेहऱ्यावर आणि छातीवर ठोसे मारत आक्रोश केला होता, 'तुझ्यामुळे गेला तो! तो माझं सारं काही होता... तुझं भलं होणार नाही... तुझं भलं होणार नाही!' मुथूला तिच्या तावडीतून सोडवायला अनेक लोक पुढे

धावले होते. 'तुझ्यामुळे तो गेला. मी सारं काही गमावलं.' तिचा आक्रोश त्याला भेडसावत राहिला. त्याच्या मनावर सपासप वार करत राहिला. एखाद्या वृक्षाप्रमाणे, तो तिथेच खिळून उभा राहिला. त्याला हुंदके अनावर झाले.

परंतु, तिच्या इच्छेकडे कोणीही लक्ष दिलं नाही. सरतेशेवटी, तो निष्प्राण देह जाळायला नेण्यात आला. नंतर, अनेकांनी तिची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. लोक म्हणाले, 'तो काही आयुष्य पूर्णत्वाने जगला नाही, शांतीने मेला नाही, हो की नाही. सांग बरं? त्याला जमिनीत पुरलं तर शांती मिळणार नाही. किती तरुण आणि तगडा होता तो. त्याला जाळणंच योग्य आहे.' परंतु, कुणाच्या कोणत्याही सांगण्याने तिचं मन थाऱ्यावर येत नव्हतं. कालीच्या देहाची रक्षा पसरवलेल्या त्या पारोशा पिंपळाच्या डहाळीची तिला आठवण झाली. 'सीरायी'ने ती उचलून भिरकावून दिली होती. म्हणूनच, पोन्नाने एक मोठा दगड उचलला आणि खड्ड्यातल्या राखेवर ठेवला. कालीला दहन केलं असलं तर काय झालं? याचा अर्थ असा नाही की त्याच्याबरोबरच्या तिच्या आठवणीसुद्धा त्यांनी दहन केल्या! 'सीरायी'ने ती डहाळी उचलून भिरकावून दिली म्हणून काय झालं? शेतात पसरलेल्या दगडांमध्ये त्याचा चेहरा सातत्याने पाहण्यापासून पोन्नाला कोणी थांबवू शकणार नव्हतं.

प्रत्येक वेळेस, शेतात गेल्यावर ती त्या दगडाकडे पाहत असे. त्या दगडाला उद्देशून ती बोलू लागे. 'मला इथे सोसायला सोडून गेला आहेस तू! हे योग्य आहे का? तू किंचित जरी इशारा केला असतास, तर मी माझं आयुष्य संपवलं असतं. तू कशाकरता मेलास? हे काय करून बसलास तू? का मेलास? का केलंस असं? अरे, तुझं पोर पोटात वाढवायचं होतं मला म्हणून मी स्वत:चा सत्यानाश करून घेतला. तुझ्याशी प्रत्येक गोष्टीबद्दल बोलत होते मी, पण हे विचारायला मात्र चुकले की! इतरांच्या शब्दांनी मी स्वत:ला मूर्ख बनवून घेतलं. सामी, माझ्या ईश्वरा! तू मला दूर ढकलून देऊ शकला असतास. चिडवायचास तू मला, दुसऱ्या कोणा स्त्रीशी लग्न करशील, असं म्हणायचास. तेही करू शकला असतास तू. मरायला कशाला हवं होतं रे तुला? मला तुझ्याबरोबर घेऊन चल बाबा! ज्या फांदीला तू स्वत:ला लटकून घेतलंस ती फांदी जरी त्या सगळ्यांनी छाटली असली तरी त्या झाडाला दुसऱ्या फांद्या नाहीत का? तुझी पावलं पकडून तू जाशील तिथे येईन मी.'

सुरुवातीच्या दिवसांत, कोणी ना कोणी सारखं तिच्या मागे असायचं.

दु:खापोटी ती काही तरी आततायीपणा करेल, हे सगळ्यांना चांगलं ठाऊक होतं. त्यापायी, पोन्नाच्या माहेरची माणसं आणि 'सीरायी' सुद्धा तिला मिनिटभर देखील एकटं ठेवत नव्हते. ती शौचाला बसली तरी कोणी तरी येऊन बाजूला उभं राही. रात्री, तिच्या आजूबाजूला कोणीतरी निजलेलं असेच. तिची आई, 'वल्लयी' तिला म्हणाली होती, 'हे बघ, लाज वाटणं स्वाभाविक आहे; परंतु स्वत:ला ठार करण्याइतकं भयंकर काय घडलं होतं? या जगात कितीतरी बायका आहेत, ज्या रोज रात्री वेगळ्या पुरुषाकडे जातात. त्यांचे नवरे तर छाताड काढून खुशाल भटकतात इकडेतिकडे. याच्यासारखा कोणी पाहिला नाही हो आजवर!' पोन्नाचं समाधान होण्यासाठी ती असं बोलत होती. परंतु पोन्नाच्या मते, त्या साऱ्यांनी योजनाबद्ध नियोजन करून कालीला ठार केलं होतं आणि आता सगळा ठपका कालीवरच ठेवत होते.

अंत्यविधी उरकल्यावर पोन्नाला माहेरी घेऊन जावं अशी तिच्या वडिलांची इच्छा होती. 'सीरायी' मौनपणे अश्रू ढाळत होती. सगळेच गप्प होते. स्वत:ला सावरत 'सीरायी' म्हणाली होती, 'मी एकटीनेच जगावं आणि एकटीनेच मरावं हेच नशीब आहे माझं. ही जर आता तुमच्याबरोबर आली, तर निदान आपल्या भावाच्या लेकराकडे पाहत तिला थोडं तरी समाधान मिळेल. खुशाल घेऊन जा तिला तुमच्याबरोबर.'

पोन्नाने तिच्या माहेरी जावं, या कल्पनेला कालीच्या काही नातेवाइकांनी सुद्धा पाठिंबा दर्शवला. ते म्हणाले, ''स्वत:चं तर मूलबाळ नाहीच हिला. इथून पुढे तिचं माहेरच काय ते तिचं कुटुंब आहे. काहीही झालं तरी, तशीच तर रीत आहे.'' काहीजण मात्र म्हणाले, ''पोटापाण्याचं काय तिच्या? राहू दे तिला इथेच. शेतात काम करेल, म्हातारीकडे लक्ष देईल. उतारवयात म्हातारीकडे लक्ष द्यायला नको का कुणी?''

एव्हाना, कालीच्या नातेवाइकांनी वेगवेगळ्या पद्धतीच्या अफवा पसरवायला सुरुवात केली होती. ताडाची वाडी असलेल्या 'सेवथान'बरोबर तिची बऱ्याच काळापासून भानगड आहे, कालीला स्वत:ला ते दिसलं होतं त्यामुळेच त्याने स्वत:ला संपवण्याचा निर्णय घेतला होता, अशी कुजबुज सुरू झाली होती. जेव्हा 'सेवथान'ला त्याबद्दल विचारण्यात आलं तेव्हा त्याने ते मान्यही केलं नाही, पण कशाला विरोधही दर्शवला नाही. तो हसला होता. त्याच्या त्या हसण्यात खूप अर्थ होता. कोणी तर असंही म्हणत होतं, 'कालीने विरोध केला

म्हणून मुथूनेच त्याला वाटेल तशी मारहाण करून झाडाला लटकवून टाकलं होतं.' काहींचा असाही आरोप होता, 'त्या निपुत्रिक जोडप्याचा सगळा जमीनजुमला गिळंकृत करण्याचा मुथूचा डाव होता.'

हे सगळं ऐकल्यावर, आपण नेमकं काय करायला हवं याबद्दल पोन्नाच्या मनात जराही शंका उरली नव्हती. इथून कुठेच जायचं नाही, असंच तिला वाटत होतं. कालीबरोबर जाणं ही सगळ्यात योग्य गोष्ट होती. जिथे काली नाही, अशा जगात जगून उपयोग तरी काय होता? तिच्यासाठी तो सारं काही होता, पण तो तर आता गेला होता-जाण्यापूर्वी, तिचा विचार करायला क्षणभरदेखील थांबला नव्हता तो.

त्यामुळे, एका जागी बसून ती रडत राहिली. तिने उठून घासभर अन्न खावं म्हणून तिची समजूत घालणं 'वल्लयी'ला फार जड गेलं. 'वल्लयी'ने कितीही आर्जवं केली, तरी पोन्नावर त्याचा काहीएक परिणाम होत नव्हता. तिने तिथेच राहावं की माहेरी जावं, याबद्दल कुठलाही निर्णय होत नव्हता. ज्योतिषाला विचारायचं असं त्यांनी ठरवलं. दिवसकार्य झाल्यावर मग त्या कुटुंबाला नेहमीसारखं जगता येणार होतं. त्यापूर्वी, करत्तूर टेकडीवरच्या देवळात जाऊन तिथल्या देवांची प्रार्थना-पूजा करणं आवश्यक होतं. परंतु, गेलेल्या आत्म्याला सुतककाळात अद्याप शांती मिळालेली नसते असा समज होता. त्या दिवसांत देवळात जाणं, कुठल्याही शुभप्रसंगी उपस्थित राहणं, हे रीतिरिवाजात बसत नव्हतं.

ओडाक्काडूहून आलेल्या वयस्कर ज्योतिषाच्या भल्यामोठ्या मिश्या होत्या. हातातले चिंचोके फेकत त्याने काही तक्ते वाचले. मग तो ठासून म्हणाला, ''चार वेळा खात्री करून घेतली आहे मी. तीन महिन्यांसाठी तरी वाट बंद आहे. धिप्पाड माणूस होता तो. त्याचा आत्मा फार चटकन शांत होणं शक्यच नाही. मृत्यूच्या दिवसापासून तीन महिने पुढे मोजा. त्यानंतर जाऊन टेकडीवरच्या मंदिरात प्रार्थना करा. मग, आपल्या मरीआई मंदिरात जाऊन नेवैद्य दाखवा. मगच तुम्ही रोजच्याप्रमाणे जगायला मोकळे.''

मिशीवाल्या त्या म्हाताऱ्याच्या सल्ल्याविरुद्ध आजवर कोणी गावकरी गेले नव्हते. परंतु, कूनाप्पालायाम इथल्या, धुंदीत नाचणाऱ्या, शमन पुजाऱ्याचा सल्ला घ्यायचा निर्णय पोन्नाच्या वडिलांनी घेतला. एरुक्कूमची फुलं वापरून हा पुजारी आपलं दैवी कार्य करत असे. मूठभर फुलं उचलून तो ती जमिनीवर उधळून देई. ती फुलं सुलटी पडली, उलटी पडली, की बाजूला, यावरून तो त्याचे अंदाज वर्तवत असे. त्यानेही हे घोषित केलं की, सुतकाचा कालावधी

तीन महिने राहील. तो पुढे म्हणाला, ''फार लवकर संपलं ते आयुष्य. संतापाने ते पुन्हा पुन्हा परतून येणार. आणखी एखादा बळी दिल्यानंतरच असे जीव शांत होतात. आपल्या लेकीकडे नीट लक्ष ठेवा.''

अशाप्रकारे, सुतकाचा कालावधी संपेपर्यंत, पोन्नाला तिथेच राहावं लागणार हे ठरलं. परंतु, त्या घरात राहायची तिची इच्छा नव्हती. तिला शेतात राहायचं होतं. एका प्रकारे ती कल्पना योग्यच ठरली. ते सगळेच शेतात राहून गुराढोरांकडे, मेंढ्यांकडे लक्ष देऊ शकणार होते. ते तीन महिने, तिची आई तिच्याचबरोबर राहिली. सुरुवातीला, 'वल्लयी' गावातल्या घरी, 'सीरायी'कडे रोज जात असे. तिथेच ती स्वयंपाक करे आणि पोन्नासाठी डबा घेऊन येई. हळूहळू, शेतावरच एकेक वस्तू आणून तिने तिथेच रांधायला सुरुवात केली. 'सीरायी'चं म्हणाल तर ती सतत अस्वस्थ असे. तिला कुठल्या तरी कामात गुंतवणं गरजेचं होतं. पोन्ना तर काहीही करत नव्हती. ती अजून भानावरच आलेली नव्हती. तिची आई आणि सासू क्षणभरसुद्धा तिला नजरेआड होऊ देत नसत.

झोपडीतल्या कुठल्या तरी कोपऱ्यात ती नुसतीच बसून राही. तिथे बसलं की कालीच्या मांडीवर किंवा छातीवर डोकं टेकवल्यागत तिला वाटे. अधूनमधून तिची नजर झाडाच्या त्या फांदीकडे वळे. ती फांदी पुन्हा पहिल्यासारखी वाढली आहे, असं तिला वाटे. अशा वेळेस, त्या फांदीवर लटकणारा फास तिला दिसे. पुढच्याच क्षणी, त्या फासात लटकलेला कालीचा देह तिला दिसू लागे. त्याचा तो भयानक चेहरा तिच्यासमोर येई, खाटेवर बघितलेलं त्याचं ते विद्रूप रूप तिच्यासमोर येई. त्याचे मोकळे केस वाऱ्यावर भुरुभुरु उडत. त्या प्रतिमेकडे फार वेळ पाहणं तिला शक्य होत नसे. संताप आणि भीती यांचा उद्रेक होऊन ती ढसाढसा रडू लागे. कालीच्या मृत्यूच्या शोकांतिकेपेक्षा त्याची ती मनात रुतलेली भयानक प्रतिमा हीच अत्यंत क्रूर शिक्षा आहे, असं तिला वाटत होतं. रोजच ती भीतिदायक प्रतिमा पाहून हळूहळू तिला त्याची सवय होऊ लागली. तिने त्याच्याशी संवादही साधायला सुरुवात केली.

इथून पुढे त्या झाडाकडे कधीच पाहायचं नाही, असा निश्चय करत तिने घागरीतल्या पाण्याचे सपकारे चेहऱ्यावर मारले. राखेने दात घासले. तिला तोंडात विचित्र कडवट चव जाणवली.

त्या तीव्र चवीनेच पोन्नाला कसंबसं जागेवर ठेवलं.

◆

पुस्तकाच्या पानांतून



रिपोर्टिंग पाकिस्तान

मीना मेनन

अनुवाद

मुक्ता देशपांडे

इस्लामाबादमध्ये वास्तव्य करून पाकिस्तानचा आँखो देखा हाल माध्यमांतून मांडणाऱ्या मीना मेनन यांचं लक्षवेधी अनुभवकथन

इस्लामाबाद–एक स्वप्नवत शहर

मध्यरात्रीचं स्वागत

आम्ही पाकिस्तानात पोचलो आहोत, लाहोरला उतरलो आहोत, हे वास्तव पचवायला आमच्याकडे वेळ नव्हता. या शहराला मी भेट देऊ शकले नाही हा भाग वेगळा! व्हिसाबाबत असलेल्या निर्बंधांविषयी अनभिज्ञ असलेले लोक मला आश्चर्यानं विचारत – तुम्ही लाहोरला गेला नाहीत? जणूकाही तिथं पटकन् जाऊन येणं माझ्यासाठी अगदी सोपंच होतं. हो, हो, मला हे माहीत आहे की तुम्ही लाहोर बघितलं नाही, तर तुमचं जगणं व्यर्थ आहे वगैरे. आणि मोठ्या विनम्र भावानं मला हे पुन: पुन्हा सांगितलं जायचं. मी एकदा दिल्लीला गेले असताना JNU मध्ये

(जवाहरलाल नेहरू युनिव्हर्सिटी) असगर वजाहत यांचं नाटक –'जिस लाहोर नैं देखा ओ जम्या नै'-पाहिलं होतं, त्यावरूनच मला समाधान मानावं लागलं.

इस्लामाबादला जाणारं विमान पकडण्यासाठी माझा नवरा वेंकट आणि माझ्याकडे जेमतेम वेळ होता. दोन इंजिनं असलेलं ते विमान हवेत तरी झेप घेऊ शकेल का, अशी शंका यावी अशी त्याची तोळामासा प्रकृती दिसत होती. परंतु त्यातली छोटी केबिन आरामदायक होती आणि आम्ही फार उंचावरून उडत नसल्यामुळे शहराबाहेरचे, ग्रामीण भागातले दिवे अधूनमधून चमकताना दिसत होते. एक तासापेक्षा कमी वेळातच राजधानीच्या भूमीला आम्ही स्पर्श केला – इतकं सोपं होतं सगळं. नवी दिल्लीहून ज्या विमानानं आम्ही आलो त्यात पत्रकार, लेखिका आणि कार्यकर्ती बीना सरवर होती. तिला मी खूप दिवसांनी भेटत होते. आम्हा दोघींनाही या भेटीमुळे फार आनंद झाला. 'द प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया'चा वार्ताहर स्नेहेश अलेक्स फिलिप आणि त्याची पत्रकार पत्नी रुचिरा हून हेही आमच्याच सोबत प्रवास करीत होते. आम्ही इस्लामाबादला पोचलो तेव्हा जवळजवळ मध्यरात्र झाली होती आणि आम्ही राहणार असलेल्या घराच्याजवळ असलेल्या मेडिकल शॉपमध्ये आम्ही पाणी विकत घ्यायला थांबलो. गोल चित्राली टोपी घातलेला आमचा ड्रायव्हर औरंगजेब–ज्याचं टोपणनाव 'एम्परर' ठेवलं होतं–म्हणजे एक वल्लीच होता. आम्हाला घेऊन जाण्यासाठी तो वाट बघत थांबला होता. 'द हिंदू'ची माझ्या आधी इस्लामाबादला काम करत असलेली वार्ताहर अनिता जोशुआ हिनं बऱ्याच कटकटीनंतर दोन वर्षांसाठी भाड्यानं घर मिळवलं होतं, त्यामुळं घर शोधण्याच्या त्रासदायक ठरू शकणाऱ्या कामातून माझी सुटका झाली होती; कारण ही प्रक्रिया काही सोपी नव्हती.

तिथं दुकानं उशिरापर्यंत उघडी असतात. आमच्याकडे बघून विक्रेत्याला आम्ही कोठून आलो आहोत, हे जाणून घेण्याची उत्सुकता होती. आम्ही भारतीय आहोत हे समजल्यावर तो आश्वासक हसला आणि म्हणाला, ''पाकिस्तानात तुमचं स्वागत आहे.'' शेवटी मी खरीखुरी सीमा पार केली होती तर! इस्लामाबादमधल्या फक्त दोन लोकांना मी ओळखत होते. काठमांडूला एका पर्यावरणासंबंधी कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी माझ्याबरोबर ते दोघं पत्रकारही आले होते. त्या वेळी, आमची पुन्हा कधी भेट होईल, असं आम्हाला वाटलं नव्हतं. मी एका अनोळखी देशात आले आहे, असं मला

क्षणभरही वाटलं नाही. आम्ही घरी पोहोचल्यावर माझ्या सहकाऱ्यांचा मित्र असलेल्या शेजाऱ्यानं आम्हाला तेवढ्या मध्यरात्री सुद्धा चहा प्यायला बोलावलं. पण मुंबईपासूनचा प्रवास करून आम्ही दमलो होतो. त्यामुळं ते आग्रहाचं आमंत्रण आम्हाला नाकारावं लागलं.

आमचं घर म्हणजे चार बेडरूमचा एक मजली बंगला होता; समोरच्या बाजूला छोटीशी लॉन होती आणि गाडी ठेवण्यासाठी पोर्च. पोर्चमध्ये १९९७ सालच्या ऑगस्टमध्ये अमित बरुआनं विकत घेतलेली जुनी-पुराणी सुझुकी सेडान गाडी, मार्गल्ला (Margalla) होती. त्यानं 'नॉर्मल' नोंदणी क्रमांक असलेली ती कार विकत घेतल्यावर वाहन नोंदणी विभागानं गुपचूप ती नंबर प्लेट बदलून भारतीयांना ओळखण्याची खूण असलेली २७ क्रमांकाची पिवळी नंबर प्लेट त्या जागी बसवली. जणूकाही आमची ओळख सर्वत्र मिरवणारा तो एक इशारा किंवा धोक्याची सूचना होती. ही नंबर प्लेट एक दिवस मला अडचणीत आणणार होती, हे मला माहीत नव्हतं. परंतु तिनं तसं आणलं, माझ्या योगा कम पिलाटिस शिक्षिकेच्या संदर्भात. मी जेव्हा सकाळी तिच्याकडे क्लासला जायचे, तेव्हा माझी कार तिच्या घराबाहेर उभी करायचे. एक दिवस एका पोलिसानं, माझ्याकडे नेहमी आठ्या घालून पाहणाऱ्या तिच्या उंच सिक्युरिटी गार्डला त्या गाडीबद्दल विचारलं आणि ती तिथं उभी का असते, याची चौकशी केली. त्या शिक्षिकेनं शक्य तितक्या सौजन्यपूर्ण शब्दांत मला माझी गाडी अन्यत्र पार्क करायला सांगितलं. पण एका महिन्यानंतर मला जाणवलं, की मी तिच्याकडे जाण्याविषयी ती फारशी उत्सुक नाही. माझा वेळ तिथं फार चांगला जायचा आणि शहरातल्या काही प्रसन्न व्यक्तिमत्त्वाच्या स्त्रियांशी भेट व्हायची. त्यात काही परदेशी महिलाही होत्या. तिच्या टेरेसवर भरपूर सूर्यप्रकाश यायचा. त्याचा काही भाग काचा लावून बंदिस्त केला होता. तो आमच्या क्लाससाठी गरम ठेवला जायचा आणि तिथं एक तास घाम गाळल्यानंतर थंडगार ज्यूसचा ग्लास आमच्या हातात ठेवला जायचा. तिच्या करड्या आणि पांढऱ्या रंगाच्या केसाळ मांजरी अधूनमधून तिथं डोकवायच्या. तो अनुभव फारच छान होता आणि म्हणूनच तो फार काळ टिकला नाही.

मी जेव्हा ती गाडी विकली तेव्हा विकत घेणाऱ्यानं त्याच दिवशी ती भीतिदायक नंबर प्लेट बदलण्याची घाई चालवली होती. पूर्वी तिथं नियुक्त

असलेले माझे सहकारी बी. मुरलीधर रेड्डी यांना तो ओळखत होता, असं त्याचं म्हणणं होतं. मी माझ्या संपादकांना नवीन गाडी देण्याविषयी विचारलं आणि ती विकत घेण्यासाठी कराव्या लागणाऱ्या सोपस्करांपासून माझी सुटका झाली म्हणून मनोमन आभारही मानले. त्याआधी, कार चोरण्याच्या राजकारणाविषयी माहिती असलेल्या एका मित्रानं मला नवीन गाडी न घेण्याचा सल्ला दिला होता. तो म्हणाला होता, की ही जुनी मार्गल्ला घेऊन तू 'अ' ठिकाणाहून 'ब' ठिकाणापर्यंत जाऊ शकत असशील तर ती बदलू नकोस. शहरात सर्रासपणे गाड्या चोरीला जायच्या. संघटित माफियांना गाड्या चोरण्यात तालिबानी मदत करायचे आणि त्यांच्या साहाय्यानं त्या अफगाणिस्तानला नेऊन दोन्ही देशांत त्या विकण्याचा धंदा करायचे.[१] मी त्या मित्राच्या घरी दुपारी जेवायला गेले होते तेव्हा मुख्य रस्त्यापासून त्याच्या घराकडे थेट जाणारा रस्ता मोठ्या काँक्रीटच्या विटांचे अडसर लावून बंद केलेला होता. त्या विटाही अशा होत्या, की तुम्ही सहजासहजी त्या हलवू शकणार नाही. मला लांबून वळसा घालून त्याच्या घरी जावं लागलं. या सगळ्याचं स्पष्टीकरण मोठं तर्कसंगत होतं. गाड्या चोरणाऱ्यांना प्रतिबंध करता यावा म्हणून ही उपाययोजना केली गेली होती. त्यानं मला एक फार विनोदी किस्सा सांगितला. एका माणसानं आपली ऐटबाज कार एका इमारतीच्या बाहेर उभी केली होती. आपलं काम संपवून तो बाहेर आला तेव्हा त्याला कार कुठं दिसेना. तिथं आसपास घुटमळणाऱ्या एकाला त्यानं 'काळ्या रंगाची गाडी बघितली का,' अशी विचारणा केली आणि तो माणूस 'नाही' म्हणाला. वैतागलेला कारमालक पोलिसांकडे तक्रार नोंदवायला गेला. दरम्यान, कारमालकाच्या डोळ्यांत धूर्तपणानं धूळफेक करणाऱ्या त्या रस्त्यावरच्या माणसानं त्या नव्या-कोऱ्या कारवर टाकलेलं कव्हर काढलं आणि कार घेऊन तो पसार झाला. गाडीवर कव्हर टाकून ती कोणी पाहू शकणार नाही, याची बेमालूम व्यवस्था त्यानं केली होती! किती सोपी, तरी प्रभावी युक्ती होती! आणि कल्पकता तर अतुलनीय!

पाकिस्तानचं कडेकोट बंदोबस्तातलं गुपित

इस्लामाबादमधल्या काही काळाच्या वास्तव्यासाठी तुम्ही आधी कितीही तयारी केली असली, तरी ती कमीच पडते. जगातल्या सर्वाधिक लोकप्रिय अशा दहा पर्यटन ठिकाणांमध्ये इस्लामाबादचा क्रमांक लागत नाही याची तुम्हाला

जाणीव असते. मी इंटरनेटवर या शहराबद्दलची वरवरची वर्णनं वाचली होती, तरी इस्लामाबादमध्ये नियुक्त झालेल्या माझ्या सहकाऱ्यांवरच मला विसंबून राहावं लागलं होतं. त्यांनी मला या सुंदर राजधानीबद्दल, तिच्या आजूबाजूला असलेल्या टेकड्यांबद्दल आणि तिथल्या आदरातिथ्याबद्दल सांगितलं होतं. तरीसुद्धा, प्रत्येक गोष्ट म्हणजे आश्चर्याचा मोठा धक्काच होता. शेवटी हे पाकिस्ताननं कडेकोट बंदोबस्तात जपलेलं गुपित होतं! त्या टेकड्या, प्रशस्त बंगले, रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडांच्या रांगा, दिमाखदार बाजारपेठा या सगळ्यांमुळे भारतीय उपखंडातल्या बहुतेक सगळ्या शहरांपेक्षा याचा क्रमांक बराच वरती लागतो. हे शहर तसं नवं आहे, तरुण आहे आणि ब्रिटिशकालीन स्थापत्यशास्त्र नावालाही नसल्यामुळे कराची किंवा लाहोरपेक्षा ते वेगळं उठून दिसतं. सगळ्या इमारती काँक्रीटच्या आहेत आणि पसरट, बैठ्या आहेत. सौंदर्यशास्त्राच्या दृष्टीनं कदाचित कमी प्रतीच्या, वास्तुकलेचा नमुना नाही म्हणता येणार, परंतु आधुनिक आणि प्रशस्त आहेत. कुत्र्यांच्या छत्र्यांसारखी अस्ताव्यस्त उगवलेली उपनगरं मुख्य शहरापासून लांब आहेत. वस्त्याही पटकन् नजरेला पडत नाहीत आणि कराचीला दिसतात तसे गरीब लोकही दिसत नाहीत. लेखिका शोभा डे म्हणाल्या, की या राजधानीनं त्यांना युरोपातल्या छोट्याशा शहराची किंवा अगदी बॉनची आठवण करून दिली. इस्लामाबाद हे बागकामाचं वेड असलेल्यांचंही शहर आहे. माझ्या शेजाऱ्यांनी त्यांच्या कुंपणालगत असलेल्या झुडपांना वेगवेगळ्या फुलांचे आणि प्राण्यांचे आकार देऊन आपल्या कर्तनकलेचा आविष्कार घडवला होता. लांबलचक हिरव्यागार गवताच्या पट्ट्यांवर दिवसभर सलवार-कमीज घातलेले पुरुष पानं कापत, गवत छाटत, फुलांच्या ताटव्यांची मशागत करत असलेले दिसायचे. मला पण एक माळी मिळणार असल्याचं समजल्यावर मला गंमत वाटली. आपल्या मोकळ्या वेळात येऊन काम करणारा माणूस आमच्या छोट्या लॉनची देखभाल करायचा, झाडांची काळजी घ्यायचा, मोठ्या प्रेमानं त्यांना पाणी घालायचा आणि मी जे सांगेन ते आणून लावायचा. उत्तम प्रकारे निगा राखलेल्या झाडांच्या सावलीत विसावलेल्या इस्लामाबादच्या गल्ल्यांकडे बघून सगळं काही सुरळीत असल्याची सुखद भावना तुमचं मन व्यापून टाकते आणि थोड्याच अंतरावर तरुण मुलांना आत्मघातकी बॉम्बर बनण्याचं प्रशिक्षण देण्यात येतं, यावर तुमचा विश्वास बसणं कठीण होऊन जातं. बॉम्बस्फोटांनी आणि धर्माच्या आधारे होणाऱ्या कत्तलींनी हा देश

रक्तलांच्छित होत असेल, याची कल्पनाही करवत नाही. देखणे दिवाणखाने आणि हिरवाईनं नटलेल्या या राजधानीला विसंगतीची ही काळी किनार गालबोट लावते. मला टी. एस. इलियट यांच्या ओळींची आठवण झाली: 'त्या खोलीत स्त्रिया येतात आणि जातात/त्या मायकेल अँजेलोबद्दल बोलतात.'

म्हणूनच जेव्हा अधूनमधून येणाऱ्या बंदुकांच्या आवाजांनी आणि कानठळ्या बसवणाऱ्या दोन स्फोटांनी ती रम्य शांतता एका हिवाळ्यातल्या सकाळी भंग पावली, तेव्हा खरं तर मला आश्चर्य वाटायला नको होतं. मोठी काचेची तावदानं भीतिदायक पद्धतीनं थडथडली आणि घर कोसळतं की काय, अशी शंका माझ्या मनाला चाटून गेली. सकाळचे नऊ वाजून गेले होते आणि नेहमीप्रमाणे टीव्ही सुरू होता. मी माझ्या 'ऑफिस'मध्ये बसून इंटरनेटवर बातम्यांचा शोध घेत होते. तिथं विशेष काही नव्हतं. 'बातमी नाही,' असं ट्विट मी केलं. लगेचच भयचकित करणारी बातमी आली. माझ्या घराच्या मागे असलेल्या जिल्हा न्यायालय संकुलात बॉम्बस्फोट झाले होते. जसं चित्र उभं केलं होतं तसं सुरक्षित वातावरण राजधानीत नव्हतंच तर... सुंदर इस्लामाबाद हल्ल्याचं लक्ष्य बनलं होतं. अशी वेळ या शहरावर काही पहिल्यांदाच आली नव्हती आणि शेवटची तर नाहीच नाही. क्षणभरासाठी सगळं जीवन जणूकाही स्तब्ध झालं होतं. मी आणखी आवाज येतात का, याचा वेध घेत राहिले आणि ते येतच राहिले. खिडक्यांच्या काचा थरथरतच होत्या. मी लवकरच रस्त्यावर जाऊन आत्मघातकी बॉम्बहल्ल्याची रक्तरंजित दृश्यं बघणार होते – कोणत्याही परवानगीशिवाय आणि अर्ज-विनंत्यांशिवाय. पण त्याबद्दल पुढं लिहीन.

पठारावर वसलेली राजधानी

राजधानीच्या या शहराची रचना मोठी काळजीपूर्वक केली आहे. त्याची विभागणी आखीव-रेखीव सेक्टरमध्ये असून, प्रत्येक सेक्टरला त्याची स्वतंत्र बाजारपेठ आहे आणि प्रत्येक झाड त्याच्यासाठी खास निवडलेल्या जागी लावलेलं आहे. कधी काळी ही जागा म्हणजे 'नैसर्गिक टेरेसेस आणि कुरणं' आणि काही झाडं असलेलं एक पठार होतं यावर आता विश्वास ठेवणं कठीण जातं.[२] उंच उंच कांचनवृक्षांना हिवाळ्यात बहर येतो आणि त्याच्या बुटक्या व जाडगेल्या फुलांपासून एक स्वादिष्ट पदार्थही बनवता येतो. जसजसा वसंत ऋतू जवळ येतो तसतशी निळ्या-जांभळ्या फुलांचे घोस

अंगाखांद्यावर मिरवणारी नीलमोहराची झाडं बहरतात. हिवाळ्यात या झाडांचे रंग बदलून ती लालसर करड्या रंगाची दिसू लागतात. लांबलचक रस्त्यांच्या दोन्ही कडांना रंगीबेरंगी फुलांच्या झाडांच्या रांगांच्या रांगा आहेत. कराचीमधल्या धावपळीशी आणि तिथं नांदत असलेल्या अठरापगड संस्कृतींशी तुलना करता राजधानीचं हे शहर थोडं निर्जीव आणि शांत वाटू शकतं. तिथं वास करून असलेल्या नोकरशाहीशी सुसंगत असं! कोलाहलापासून मुक्त असं राजधानीचं शहर अध्यक्ष मोहम्मद अयूब खान यांना अपेक्षित होतं, आणि तसंच ते आहे. हिमालयाच्या परिघावर असलेल्या कमी उंचीच्या मार्गल्ला टेकड्यांमुळे आजूबाजूच्या भौतिक जगापासून हे शहर लांब, अस्पर्श असल्यासारखं वाटतं.

एखाद्या निरभ्र दिवशी, मार्गल्ला हिल्समधल्या सर्वांत उंच ठिकाणी कड्याजवळ असलेल्या 'मोनाल' या अतिशय लोकप्रिय रेस्टॉरंटमधून पाहिलं असता इस्लामाबाद दिव्यांच्या लखलखाटात न्हाऊन निघाल्यासारखं दिसतं. अबोटाबादकडे जाणाऱ्या एका खिंडीच्या थोडं अलीकडे हे रेस्टॉरंट आहे. खाली पाहिलं असता वेडीवाकडी वळणं घेत सरपटत जाणारे रस्ते आणि त्या पलीकडे राजधानीचं हे शहर दिसतं. या रेस्टॉरंटकडे जाताना वाटेत एक स्मारक आहे. दि. २८ जुलै २०१० रोजी एअरबस २०२ हे विमान या ठिकाणी डोंगरावर कोसळलं होतं आणि त्यात १५२ प्रवाशांचा मृत्यू झाला होता. त्या घटनेचं हे स्मारक आहे. पहिल्यांदाच ज्या संध्याकाळी आम्ही 'मोनाल'ला गेलो होतो तेव्हा अचानक वादळी पाऊस आला आणि भिजू नये म्हणून आम्हाला धावतपळत आतल्या बाजूचं टेबल गाठावं लागलं होतं. काळ्याकुट्ट रात्रीच्या पटावर विजांचे लोळ उभ्या-आडव्या रेघोट्या उमटवत होते. आम्ही जेवणासाठी कॉंटिनेंटल पदार्थांची निवड केली आणि समोर आलेल्या सुग्रास भोजनानं आमची रसना तृप्त झाली. बऱ्याचदा रविवारच्या दिवशी आम्ही डोंगरातल्या अनेक पायवाटांपैकी एखादी वाट पकडायचो आणि मजल-दरमजल करत 'मोनाल'ला न्याहारीसाठी येऊन पोचायचो. त्या स्वादिष्ट न्याहारीनं सगळा थकवा चुटकीसरशी पळून जायचा. हिवाळ्यात शहरावर तलम धुक्याची चादर पसरलेली असायची आणि त्यात ते शहर लुप्त होऊन जायचं.

पर्यटनस्थळ म्हणून नावारूपाला आलेल्या पुरातन सैदपूरमध्ये एका जुन्या रिकाम्या मंदिराशेजारी आणि एका गुरुद्वाराच्या पुढे एक हॉल आहे;

त्यात इस्लामाबादचा पाकिस्तानची राजधानी घडेपर्यंतचा प्रवास काळ्या-पांढऱ्या छायाचित्रांमध्ये बंदिस्त करून मांडला आहे. तिथं भेट देणाऱ्यांसाठी रोज संध्याकाळी एक माणूस येऊन रेबाब हे वाद्य वाजवतो. त्याचं वादन ऐकताना मनात एक दु:खी भाव दाटून आला, पण ते वादन हृदयाला स्पर्श करून गेलं. आम्ही व्हरांड्यात बसून थोडा वेळ ते कानात साठवून घेतलं. काही वर्षांपूर्वी सैदपूर गावाचा कायापालट करण्यात आला. आता तिथं खूप रेस्टॉरंट आहेत आणि त्यातल्या एका भारतीय जेवण देणाऱ्या रेस्टॉरंटची आम्हाला शिफारस करण्यात आली होती. परंतु, खेदाची गोष्ट अशी, की ते आमची अपेक्षा पूर्ण करण्यात कमी पडलं. छायाचित्र पाहताना सुरुवातीचा विस्तीर्ण माळरानासारखा प्रदेश पाहून मला आश्चर्य वाटलं, कारण त्यानंतर त्यावर सर्व सुखसोईंनी युक्त अशा शहराची उभारणी करण्यात आली. इस्लामाबादची रचना ग्रीक वास्तुरचनाकार सी. ए. डोक्सियाडिस याने केली आहे आणि त्या छायाचित्रांमध्ये अध्यक्ष अयूब खान शहररचनेचा आराखडा अनेक नेत्यांना दाखवत असल्याचं एक छायाचित्र आहे. त्या नेत्यांमध्ये भारताचे तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू आहेत आणि चीनचे राष्ट्रप्रमुख जोएन लाय हे एक झाड लावताना दिसत आहेत. पाकिस्तानची राजधानी निरोगी वातावरण असलेल्या प्रदेशात निर्माण व्हावी, अशी अध्यक्ष अयूब खान यांची कल्पना होती. प्रशासनाला थकवणारं रोगट हवामान आणि अस्वच्छ परिसर असलेल्या कराचीपेक्षा त्यांना ही जागा अधिक पसंत होती. कराचीचं उग्र राजकीय स्वरूप आणि व्यवसायांचा भ्रष्टाचारी प्रभाव याबाबत त्यांच्या मनात चिंतेची भावना होती.[३] मार्गल्ला डोंगररांगांनी वेढलेल्या पोतवार पठाराची जागा राजधानीसाठी योग्य वाटल्यानं तिची निवड जनरल याह्याखान यांच्या अध्यक्षतेखालील समितीनं केली. राजधानीला अयूब खान यांचं नाव देण्याचा प्रस्ताव थोडक्यात बारगळला. इस्लामाबाद हे नाव सुचवण्याचं थोडं फार श्रेय झुल्फिकार अली भुत्तो यांचे मुंबईतले वर्गमित्र पिलू मोदी यांच्याकडे जातं -

> 'त्या संध्याकाळी मी पाकिस्तानच्या इतिहासासंबंधी एक छोटंसं टिपण लिहिलं. मी अध्यक्ष अयूब खान यांच्याशी बोलत होतो आणि त्या सगळ्यांनी पाकिस्तानसाठी नवीन राजधानी उभारण्याचा निर्णय घेतला आहे म्हणून मला झालेला आनंद मी त्यांच्यापाशी

व्यक्त केला. परंतु, अशा प्रकारचं शहर हे सजीव भासलं पाहिजे, यासाठी त्याचं नाव प्रेरणादायी असणं आवश्यक आहे, असं मला वाटलं. कारण त्यामुळं जनतेच्या भावनांना हात घालता येतो. 'पाकिस्तानी संघराज्याची राजधानी' एवढाच त्याचा उल्लेख करणं पुरेसं नव्हतं. मला हे लख्ख आठवतं. ती रविवारची रात्र होती. सोमवारी मी मुंबईला परत आलो आणि बुधवारी सकाळी मी मुंबईच्या वृत्तपत्रांमध्ये बातमी वाचली, की पाकिस्ताननं आपल्या नव्या राजधानीचं नाव 'इस्लामाबाद' असं ठेवलं आहे. हा एक विलक्षण योगायोग आहे, असं समजून मी त्याकडे फारसं लक्ष दिलं नाही. परंतु नंतर मला समजलं, की अयूबना माझी कल्पना पसंत पडली होती. सोमवारी सगळं मंत्रिमंडळ रावळपिंडीला गेलं. सोमवारी दुपारी एक सर्क्युलर निघालं, की मंगळवारी सकाळी मंत्रिमंडळाची बैठक होईल. त्यात कोणते विषय चर्चेला येतील या विषयी काहीच सांगितलं गेलं नव्हतं; किंबहुना ही बैठक कोणत्याही विशेष कारणासाठी होणार नव्हती. जेव्हा मंगळवारी मंत्रिमंडळातले सदस्य एकत्र जमले तेव्हा अयूब यांनी माझ्याशी त्यांची भेट झाली होती, असं सांगितलं आणि राजधानीला तातडीनं नाव देण्यात यावं अशी मी सूचना केली असल्याचंही सांगितलं. अनेक नावं सुचवण्यात आली; त्यात 'अयूबाबाद' हे नावही होतं. मग कुणी तरी 'इस्लामाबाद' असं नाव घेतलं आणि अयूब यांनी या नावावर पसंतीची मोहोर उमटवली. अशा रितीनं पाकिस्तानच्या राजधानीचं नामकरण झालं. मी असं ऐकतोय की, ही कहाणी अयूब यांनी अनेक लोकांना सार्वजनिक कार्यक्रमांदरम्यान, सभांदरम्यान पुढचे कित्येक आठवडे सांगितली.'

अयूबखान यांच्या मंत्रिमंडळात तेव्हा मंत्री असलेल्या झुल्फिकार अली भुत्तो यांचे वर्गमित्र असलेले मोदी हे त्या काळी बऱ्याच गोष्टींमध्ये सहभागी असायचे.

◆

नवी संहिता... नवा आशय...

द रॅकेटिअर

जॉन ग्रिशॅम

अनुवाद

अशोक पाथरकर



सरळमार्गी माल्कमच्या आयुष्यात आलेलं
थरारनाट्य, त्यावर बुद्धिकौशल्य व चातुर्याने
केलेली मात याचा रोमांचक प्रवास

किंमत : ६६०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

शार्लटन्स

रॉबिन कुक

अनुवाद

उज्ज्वला गोखले



तीन रुग्णांच्या मृत्यूच्या संशयाची सुई आहे
ॲनेस्थेसियालॉजिस्ट डॉ. एवा लंडनकडे...
तिचं व्यक्तिमत्त्व गूढ...
रेसिडेन्ट डॉक्टर नोहाचा त्या गूढापर्यंत पोहोचण्याचा चित्तथरारक प्रवास

किंमत : ७५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

पुस्तकाच्या पानांतून



लाल बर्फाचे खोरे

जीतेंद्र दीक्षित

अनुवाद

पराग पोतदार

व्यापक ग्राऊंड रिपोर्टच्या माध्यमातून मांडली गेलेली बदलत्या काश्मीरची वस्तुनिष्ठ कहाणी

पोस्टर बॉईज

'जितेंद्र, मला नाही वाटत की आम्ही मुंबईला जिवंत परत येऊ शकू. आम्हाला कोणत्याही क्षणी मारले जाईल. तुला शक्य असेल तर आम्हाला कृपया मदत कर.' शिवसेनेचे हिंदी मुखपत्र असलेल्या 'दोपहर का सामना' या वृत्तपत्राचे कार्यकारी संपादक अनिल तिवारी या मित्राचा अत्यंत आगतिकतेने भरलेला कॉल आला. ८ जुलै २०१६ रोजी रात्री आठ वाजता मला त्यांचा हा कॉल आला. मुंबईत झालेल्या मुसळधार पावसाचे कव्हरेज करून नुकताच मी परतलो होतो. तेव्हा अत्यंत घाबरलेल्या आवाजात तिवारी यांनी आपली परिस्थिती मला कथन केली.

तिवारी हे काश्मीरमधील अमरनाथ तीर्थयात्रेसाठी गेलेले होते. त्यांच्यासमवेत त्यांची पत्नी, मुले

आणि सासू-सासरे, काही नातेवाईक होते. ते एकूण २३ जण होते. दुपारच्या वेळी त्यांनी जम्मूतून एक बस बुक केली आणि जिथून यात्रेला प्रारंभ होणार होता त्या पेहलगामला जाण्यासाठी ते निघाले. बस जेव्हा जवाहर बोगद्यात पोहोचली तेव्हा तपासणीसाठी पोलिसांनी मिनी बस थांबवली. त्याचवेळी ड्रायव्हर राजूच्या मोबाइलवर एक संदेश आला की सुरक्षादलाचे जवान आणि दहशतवादी यांच्यामध्ये चकमक उडाली आहे आणि त्यात काही अतिरेकी मारले गेले आहेत. मारल्या गेलेल्या काही दहशतवाद्यांचे फोटोही राजूने तिवारी यांना दाखवले. सुरक्षा दलाचे जवान आणि दहशतवादी यांच्यातील चकमक ही नित्याची बाब असल्याकारणाने त्यांना त्यात फार काही विशेष वाटले नाही. पुढे त्यांच्यासाठी काय वाढून ठेवले आहे, याचा अदमास नसल्याने त्यांची बस तशीच पुढे जाऊ लागली.

पुढे जाऊन पाहतात तो काय, जम्मू-श्रीनगर महामार्गावर हजारो सशस्त्र लष्करी जवान तैनात केलेले होते. अमरनाथ भाविकांवर व यात्रेकरूंवर झालेला हल्ल्याचा इतिहास लक्षात घेता या महामार्गावर नेहमीच वर्षभर कडक पहारा असतो. तिवारी यांची बस सायंकाळी ७ च्या सुमारास अनंतनाग शहरातून जात असताना तिथे भयाण शांतता पसरलेली होती. दुकाने बंद होती. चिडलेल्या लोकांचे छोटे छोटे समूह रस्त्याच्या कोपऱ्यांवर उभे होते. ट्राय जंक्शनवरून बस पेहलगामच्या दिशेने वळली. काही किलोमीटर पुढे गेले असतील तोच एक मोठा दगड येऊन बसच्या विंडशिल्डवर आदळला आणि विंडशिल्ड तुटली. अचानक झालेला हा प्रकार नेमका काय आहे, हे समजून घेण्याचा प्रयत्न तिवारी करू लागले. त्यांच्या पुढे अवघ्या २०० मीटर अंतरावरून जाणारी कार त्यांना दिसली. त्यातील तरुण ही दगडफेक करीत होते. तितक्यात हातात काठ्या असणाऱ्या चार-पाच तरुणांनी त्या कारला घेराव घातला आणि रॉड, काठ्यांनी हल्ले सुरू केले. 'माझ्या ड्रायव्हरने पुढील परिस्थितीचा अंदाज घेत लगेच यू टर्न घेतल्याने त्या कारमधील तरुणांचे काय झाले, हे मला कळू शकले नाही. त्यांना ठार मारले असावे किंवा त्यांना गंभीर दुखापत झालेली असावी.' असे तिवारी म्हणाले.

तिवारींच्या बसने यू टर्न घेतला खरा, परंतु आता सुरक्षिततेसाठी कुठे जावे याचा काही अंदाज येईना. एवढ्यात आणखी काही दगड येऊन बसवर आदळले. ड्रायव्हर राजूने सर्व प्रवाशांना बसच्या खिडकीच्या काचा बंद

करण्यास सांगितले. काचेवर पडणारा दगड बसमध्ये येऊ म्हणून जे सामान बरोबर आहे, ते खिडकीच्या जवळ ठेवण्याचा सल्ला त्याने दिला. काही मिनिटांपूर्वी गप्पा मारण्यात रमलेल्या किंवा धार्मिक गाणी म्हणण्यात गुंगलेल्या महिला व मुले आता भीतीने ओरडू लागली होती. सगळे रडत होते. बस पहलगामच्या दिशेने वळल्यानंतर काही किलोमीटरवर लष्कराची छावणी असल्याचे तिवारी यांना आठवले. संकटात सापडलेल्या लोकांना लष्कराचे जवान नक्की मदत करतील, या आशेने त्यांनी ड्रायव्हरला बस तिकडे घेण्यास सांगितले. छावणीच्या प्रवेशद्वारावर जो सैनिक तैनात केलेला होता त्याला तिवारी यांनी सर्व परिस्थिती कथन केली आणि मदतीची याचना केली. त्या सुरक्षारक्षकाने आपल्या वरिष्ठांशी संपर्क साधला. कोणतीही परवानगी नसल्याने प्रवाशांना छावणीच्या आत घेतले जाऊ शकणार नाही, असे त्याने सांगितले. थोडा काळ जातो न जातो तोच आपल्याला इथे नक्की संरक्षण मिळेल, या आशेवर दगडफेकीत नुकसान झालेल्या अनेक बस आणि कार त्यांच्या बसच्या मागे येऊन थांबल्या. राजूने तिवारी यांच्या निदर्शनास एक गोष्ट आणून दिली ती म्हणजे, ज्या ज्या वाहनांची नंबरप्लेट जम्मूमध्ये नोंदणी केल्याचे दर्शवत होती, त्या साऱ्या वाहनांवर दगडफेक झालेली होती. दगडफेकीत जखमी झालेले ७-८ लोक बसमधून उतरताना तिवारी यांनी पाहिले. त्यांना छावणीमध्ये प्रवेश देण्यात आला आणि त्यांच्यावर प्राथमिक उपचार करण्यात आले. इतरांना मात्र बाहेर राहण्यास आणि छावणीपासून काही अंतरावर त्यांची वाहने थांबवण्यास सांगण्यात आले. अडकलेल्या यात्रेकरूंशी बोलण्यासाठी एक लष्करी अधिकारी छावणीतून बाहेर आला. तिवारी यांनी सगळी परिस्थिती कथन करून त्याच्याशी वाद घातला तेव्हा त्याने महिला व मुलांना छावणीमध्ये प्रवेश दिला. परंतु इतरांना मात्र त्यांच्याच वाहनांमध्ये बसण्यास सांगितले. दहशतवादी त्यांच्यावर ग्रेनेड हल्ला करू शकतात, असा धोक्याचा इशाराही त्याने दिला. तिवारी हे अधिकाऱ्यांशी बोलत असताना 'अल्ला हू अकबर'च्या घोषणा देत रस्त्यावरून अनेक कार आणि एसयूव्ही जाताना त्यांनी पाहिल्या. या तरुणांच्या अशा गस्तीमुळे यात्रेकरूंच्या भीतीत आणखीनच भर पडली होती.

यात्रेकरूंनी पोलीस ठाण्यात जाऊन मदत घ्यावी असा सल्ला लष्करी अधिकाऱ्याने दिला. त्या वेळी त्याला कुणीतरी सांगितले, की पोलीस ठाण्यावरही हल्ला झालेला होता आणि त्यांना काहीही मदत करता आलेली नव्हती.

तासाभरानंतर महिला व मुलांना लष्करी छावणीतून बाहेर येण्यास सांगितले. तोपर्यंत दुपारचे दोन वाजलेले होते. लष्कराच्या त्या अधिकाऱ्याने सांगितले की पुढे काझीगुंड येथे लष्कराने यात्रेकरूंची व्यवस्था केलेली आहे, तेव्हा प्रत्येकाने इथून आता निघून जावे. परंतु आपण काझीगुंडला जात असताना आपल्यावर पुन्हा हल्ला झाला तर काय, अशी भीती तिवारींना वाटत होती. त्यामुळे त्यांनी लष्करी जवानांनी सुरक्षा देऊन आपल्याबरोबर यावे अशी विनंती केली. परंतु आम्हाला तसे कोणतेही आदेश नाहीत, असे सांगून अधिकाऱ्याने त्यांची बोळवण केली. तिवारींना त्याने सांगितले की, दगडफेक करणारे जे लोक होते त्यांच्या झोपण्याची ही वेळ असल्याने आता प्रवास करणे सुरक्षित आहे.

त्या दिवशी 'रामबन' येथे जेवल्यानंतर कोणीही काहीही खाल्ले नव्हते. पेहलगाम येथे त्यांना रात्रीचे जेवण मिळणार होते. परंतु या परिस्थितीत तिकडे जाणे निव्वळ अशक्य होते. तेव्हा धोका पत्करून आपण जम्मूला परतावे असा निर्णय तिवारी यांनी घेतला. बस जेव्हा पुन्हा श्रीनगर-जम्मू हायवेवर आली तेव्हा पुन्हा काही दगड येऊन बसवर आदळले. रस्त्यावर मात्र फारसे लोक दिसत नव्हते. काही तासांपूर्वी इथे काय भयानक परिस्थिती निर्माण झालेली असेल याचा अंदाज त्या रस्त्यावरून जाताना येत होता. रस्त्यावर दगडांचा अक्षरश: खच पडलेला होता. अनेक ठिकाणी रस्ता कोंडी करण्यासाठी मोठे वृक्ष तोडण्यात आलेले होते. तिवारी आणि राजू यांना बसमधून उतरून रस्त्यातील अडथळे दूर करावे लागले. महिला, मुले सातत्याने रडत होती. त्या रात्री आपण सारे मरणार असेच प्रत्येकाला वाटत होते. 'अमरनाथ बाबा रक्षा करेंगे,' असे सांगून ते दिलासा देण्याचा आणि मनातील भीती कमी करण्याचा प्रयत्न करीत होते. ते स्वत:ही मनातून खूप घाबरले होते. काही केंद्रीय मंत्र्यांकडून मदत मिळावी म्हणून त्यांनी ट्विट करण्याचा प्रयत्न केला; परंतु तोपर्यंत तेथील इंटरनेट सेवा पूर्णत: ठप्प झालेली होती.

अचानक इतके हिंसक हल्ले का सुरू झाले, हा प्रश्न सगळ्यांनाच पडलेला होता. त्यांनी जेव्हा या प्रवासाची योजना आखलेली होती तेव्हा अशा प्रकारच्या हिंसाचाराच्या किंवा यात्रेकरूंवरील हल्ल्याच्या कोणत्याही बातम्या नव्हत्या. काश्मीरमधील दहशतवादी कारवायांची ही दुसरी लाट सुरू झालेली आहे, याची कल्पना तिवारी यांना त्या वेळेपर्यंत आलेली नव्हती. त्या रात्री तिवारी व त्यांच्या कुटुंबाप्रमाणेच इतर हजारो यात्रेकरू, पर्यटक हिंसक

हल्ल्यांमुळे ठिकठिकाणी अडकून पडले, जखमी झाले किंवा घाबरून गेले होते.

काही तासांनंतर तिवारी यांना समजले, की ज्या दहशतवाद्याला मारल्याचे फोटो ड्रायव्हर राजूने दाखवले होते त्याचीच प्रतिक्रिया म्हणजे हे पर्यटकांवर झालेले हल्ले होते. लष्कराने बुरहानी वाणी या तरुणाला ठार मारले होते. अनिल तिवारी यांच्या ठिकाणापासून अवघ्या २५ किलोमीटर अंतरावर कोकरनाग येथे ही चकमक झालेली होती.

स्पेशल ऑपरेशन ग्रुपने (एसओजी) जम्मू पोलीस आणि राष्ट्रीय रायफल्सने त्या दिवशी दुपारी ३ वाजता श्रीनगरपासून ८० किलोमीटर अंतरावर असलेल्या दक्षिण काश्मीरमधील कोकरनाग भागातील बामदूरा गावाला वेढा घातला. गावातून बाहेर पडण्याचे सारे मार्ग त्यांनी बंद करून टाकले. गुप्तहेरांनी दिलेल्या माहितीनुसार, हिज्बुल मुजाहिदीनशी संबंधित असलेला सरताज शेख नावाचा अतिरेकी त्याच्या दोन साथीदारांसह त्याच्या मामाला भेटायला आला होता. सफरचंदांच्या बागांनी वेढलेल्या एका घरात हे तिघेजण लपलेले होते. ते जिथे लपले होते त्या ठिकाणी टीम पोहोचली. दुपारी ४.३० च्या आसपास चकमक सुरू झाली. बुरहान, सरताज आणि परवेझ अहमद यांनी टीमवर गोळीबार केला आणि तिथून पळून जाण्याचा प्रयत्न केला. एसओजीनेही प्रत्युत्तरादाखल गोळीबार केला व त्यात ते तिघेही ठार झाले. या गोळीबारामध्ये दोन सुरक्षारक्षकांनाही गोळ्या लागल्या आणि ते जखमी झाले. या वेळी त्या तिघांकडून चार कलश्निकोव्ह जप्त करण्यात आल्या. मारल्या गेलेल्या अतिरेक्यांची लवकरच ओळख पटली. त्या वेळी लष्कराच्या जवानांना आनंद झाला. कारण त्यात सर्वांत महत्त्वाचा होता तो बुरहान वाणी. त्याचे नाव अतिरेक्यांच्या मोस्ट वॉंटेड यादीमध्ये होते आणि त्याला पकडून देणाऱ्यास इनाम देण्याचीही घोषणा करण्यात आलेली होती. बुरहानचा भाऊदेखील यापूर्वी चकमकीत मारला गेला होता.

एक खवय्या, एक क्रिकेटप्रेमी आणि एक दहशतवादी

हिज्बुल मुजाहिदीनमध्ये वयाच्या १५ वर्षी बुरहान वाणी सामील झाला, त्या वेळी तो त्याच्या वयाच्या इतर काश्मिरी मुलांसारखाच होता. तो एक देखणा मुलगा होता. त्याला क्रिकेट खेळायला आवडत असे. त्याला फॅशनेबल कपडे घालायला आवडायचे. चिकनचे वेगवेगळे प्रकार खायला आवडायचे. केस

स्टायलिश दिसावे म्हणून तो केसांना जेल लावत असे. मित्रांसोबत फिरायला आणि मोटरसायकल चालवायला त्याला आवडायचे. पुलवामा जिल्ह्यातील 'त्राल' भागातील दादासरा गावात त्याचे वडील मुझफ्फर वाणी यांच्यासमवेत तो राहत असे. बुरहान धर्माविषयी फारसा उत्सुक नव्हता. तो नियमितपणाने कुठल्या प्रार्थनांनाही जात नव्हता. फुटीरतावादी चळवळीशीही त्याचा काही संबंध नव्हता. भारतीय सुरक्षा दलाशी झालेल्या चकमकीमुळे त्याच्या अवघ्या आयुष्याचा मार्ग बदलून गेला.

२०१० साली खोऱ्यामध्ये प्रस्थापित सरकारच्या विरोधामध्ये निदर्शने केली जात होती. त्या वेळी माचिल येथे झालेल्या चकमकीमध्ये तीन तरुण मारले गेले होते. ही चकमक बनावट असल्याचा आरोप करण्यात आला. त्यात लष्कराचे सहा जवान दोषी आढळले. आंदोलक आणि सरकारी फौजा यांच्यात शत्रुत्वाचे वातावरण निर्माण झालेले होते. त्यामुळे अनेक ठिकाणी हिंसक चकमकी झाल्या. त्यामुळे सर्वत्र वाहनांची तपासणी केली जात होती आणि लोकांचीही झडती घेतली जात होती. बुरहान हा त्याचा भाऊ खालिद आणि इतर काही मित्रांसह गाडीवरून जात असताना पोलिसांनी त्याला हटकले. त्यांच्यामध्ये वादावादी झाली. त्या वेळी बुरहानच्या मोठ्या भावाला जीवघेणी मारहाण झाली आणि त्याचा अवमानही करण्यात आला. या घटनेचा खूप खोलवर परिणाम बुरहानच्या मनावर झाला. आपल्या भावाच्या अपमानाचा बदला घेण्याचा निर्धार त्याने मनाशी केला. त्यातूनच मग तो दहशतवादाकडे वळला. वयाच्या अवघ्या २१ व्या वर्षी तो हिज्बुल मुजाहिदीन या संघटनेत कमांडर बनला. त्याने पीओकेमध्ये जाऊन प्रशिक्षण घेण्यासाठी नियंत्रणरेषा कधीही ओलांडली नाही. त्याच्या या कहाणीवरून लक्षात येते की फुटीरतावादी चळवळीशी जवळीक असल्याने किंवा पाकिस्तानच्या खोट्या प्रचाराला बळी पडून तो दहशतवादी संघटनेत गेला नाही तर त्यामागे त्याच्या व्यक्तिगत आयुष्याशी संबंधित कारण होते. त्याला लष्कराशी दोन हात करून आपल्या भावाच्या अवमानाचा बदला घ्यायचा होता. बुरहानच्या आयुष्यातील ही पार्श्वभूमी लक्षात घेतली तर समजते की एखादी छोटी घटनासुद्धा आयुष्यावर किती खोल परिणाम करून जाते आणि त्यामुळे अवघे आयुष्य बदलून जाऊ शकते.

◆

पुस्तकाच्या पानांतून



द वॉलेट

रॉबर्ट क्रेस

अनुवाद

सुरेश देशपांडे

पौगंडावस्थेतल्या अल्लडपणातून घडलेल्या गुन्ह्यांचा शोध घेताना एल्विस कोल आणि ज्यो पाइकनं वापरलेल्या शोधतंत्राची रंजक कथा...

हार्वी आणि स्टेम्स

क्लबच्या बाहेर असलेले हार्वी आणि स्टेम्स यांनी त्यांच्यावर सोपवलेल्या शोधात खूपच प्रगती केली होती, आता ते एका क्लबबाहेर उभे होते आणि त्यांच्याकडे असलेला फोटो त्यांना कुणाला तरी दाखवायचा होता. पण ते काही त्या क्लबमध्ये जाऊन कोणालाही फोटो दाखवून विचारू शकत नव्हते. त्यांच्याकडे असलेल्या फोटोतील क्र.१ चा अनोळखी मुलगा हा धोकादायक होता. त्या फोटोमुळे फोटोतील मुलगा, नटाच्या अंगावर ओकणारी मुलगी, आणि नंतर घडणाऱ्या सर्व घटनांचा हार्वी आणि स्टेम्स यांच्याशी थेट संबंध जोडला जात होता. पण शक्यतो अशा प्रकारचा संबंध जोडला जाऊ नये,

याची ते काळजी घेत होते, अन्यथा ते त्या दोघांच्या जीवावर बेतलं असतं.

डान्स क्लबच्या बाहेर प्रवेशासाठी लोकांची मोठी रांग पाहून हार्वी वैतागला. ''हा मूर्खपणा आहे. तुला खरंच या शंभरभर लोकांमध्ये जायचं आहे?'' हार्वीने स्टेम्सला विचारले.

''केवळ तुझ्या त्या नोकराकरीता रे, हार्वी.'' स्टेम्स म्हणाला.

''कदाचित आज रात्री तो कामावर नसेल देखील, माझ्या खबऱ्याला नक्की माहिती नाहीय.''

हा नोकर म्हणजे बावीस वर्षांचा, जामिनावर सुटलेला जेसी गझमन नावाचा मुलगा होता. हार्वी आणि स्टेम्स यांना एका मुलीने सांगितलेली गोष्ट खरी आहे किंवा नाही याची शहानिशा करायची होती. त्यासाठी त्यांनी काही फोन केले. चौकशी केली आणि ते जेसी गझमनपर्यंत पोहोचले. या गझमनचा पूर्वेतिहास काही फार चांगला नव्हता. गैरवर्तणूक आणि शिवीगाळीमुळे तुरूंगाची हवा खाल्लेला आणि अत्यंत वाईट नशीब असलेल्या या गझमनचे नशीब हार्वी आणि स्टेम्स यांच्या भेटीमुळे आणखीनच खडतर होणार होते.

''तो जर इथे भेटला नाही तर आपण त्याला त्याच्या घरी गाठू, अजूनही सगळ्या गोष्टी त्याच्या लक्षात असतील.'' स्टीम्स उदासपणे म्हणाला.

यावर हार्वी डोळे गरागरा फिरवीत म्हणाला.

''लक्षात काय ठेवणार, ओकारी? असल्या जागी ओकणाऱ्यांना कोण ओळखत बसेल? इथं रोज रात्री ओकाऱ्या पुसल्या जात असतील.''

हार्वीचा नकारात्मक दृष्टिकोन स्टेम्सला आवडला नाही.

''ती काही बाथरूम मध्ये ओकली नाही हार्वी, ती त्या टीव्ही कलाकाराच्या अंगावरच ओकली.'' स्टेम्स म्हणाला.

''स्टेम्स, मला म्हणायचं आहे की तिथे लक्षात ठेवण्यासारखं काहीच नसणार, ती तिनं तयार केलेली कथा आहे.'' हार्वी मोठा निःश्वास सोडत आणि मान हलवीत म्हणाला.

''ती खोटं बोलत नव्हती, त्या बाईने आपल्याला खरे तेच सांगितले आहे.''

''नाही, त्या प्रौढ बाईबद्दल मी बोलत नाही, पण ती ओकणारी मुलगी..ती असंच सांगेल, हे मला निःसंशय वाटत होतं. माझा या गुन्हेगारांवर अजिबात विश्वास नाही, ते नेहमीच खोटं बोलतात, विशेषतः स्वतःबद्दल. यालाच

आपण जगणं रंगविणं असं म्हणतो, हा मूर्खपणा आहे.''

''हार्वी,'' स्टेम्सने हाक मारली.

''काय?''

''तू म्हणतोयस ते बरोबर आहे, हा तिचा कदाचित बनाव देखील असू शकेल, पण आपण एकदा खात्री करून घेऊ.''

हार्वीने मान डोलावली.

त्या दिवशी सकाळी हार्वी आणि स्टेम्स सांता मोनिका येथील आठवडे बाजारात गेले असता, त्यांना तेथे एका चोरलेल्या एसएलआर कॅमेऱ्याची माहिती कळली. रापलेल्या त्वचेच्या आणि अंगावर पिवळे डाग असलेल्या त्या प्रौढ स्त्रीला कॅमेरा विकणारी जोडी स्पष्टपणे आठवत होती. अंगाने सडपातळ, हिरवे डोळे आणि मनगटावर व्रण असलेली मुलगी आणि छान दिसणारा, गालाला खळी पडणारा मुलगा अशी ती जोडी होती. ती सुदृढ मुलगी पिवळ्या कपातून व्होडकाचे घुटके घेत काहीच्या काही गोष्टी सांगत होती. जेड हॉर्स किंवा ग्रे हॉर्स सारख्या भपकेबाज हॉलीवूड क्लबमध्ये ती बऱ्याचदा जात असे आणि तिथे एका होतकरू नटाच्या अंगावर ती कशी ओकली वगैरे. स्टेम्सने लगेच एक फोटो त्या बाईला दाखविला, पण त्या फोटोतील मुलगा त्या मुलीबरोबरचा नव्हता. आपण फोटो दाखविण्याची घाई केली, असे स्टेम्सला वाटले, पण त्याचमुळे तो त्या ओकणाऱ्या मुलीपर्यंत पोहोचला आणि तिचा हॉलीवूडच्या क्लबशी संबंध होता. हार्वी किरकिऱ्या होता, पण ते त्या मुलीपर्यंत पोहोचू शकले, तर पुढे त्यांना फोटोतील क्र. १च्या मुलाचा आणि बाकी गोष्टींचा शोध लागला असता, ज्या गोष्टी शोधण्याची कामगिरी या दोघांवर सोपविली गेली होती.

जेड हाऊस हा एक उच्चभ्रूंचा क्लब होता. दरवाजावर फोटोग्राफरचा ताफा. तीनशे पाऊंडाचे दणदणीत सुरक्षारक्षक. एकीकडं तरण्या पोरींची रांग, तर दुसरीकडं आत सोडावं म्हणून सुरक्षारक्षकाला गयावया करणाऱ्या अगतिक तरुणांची गर्दी.

स्टेम्सने आपली चोरलेली क्रिस्टलर गाडी कोपऱ्यात लावली. हळूच पहारेकऱ्याच्या हातात एक हजाराची नोट सरकवली आणि आपला आत घुसायचा मार्ग मोकळा केला.

स्टेम्सला अशा जागेचा तिटकारा होता. नाचून घामाने थबथबलेले तरुण,

दारू पिणारे, ढोंगी, परदेशी श्रीमंत अशा लोकांची गर्दी होती. ड्रमच्या लयीवर आणि स्वीडिश डीजेच्या तालावर हिपहॉप नृत्य सुरू होते. आत गेल्यावर स्टेम्स आणि हार्वी दोघे वेगवेगळ्या दिशेला गेले. त्यांना त्या नोकराला शोधायचे होते. तिथल्या नोकरांशी गप्पा मारत ते त्या विशिष्ट नोकराविषयी चौकशी करत होते. अशी काही चौकशी चालू आहे, हे त्यांच्या कोणाच्या लक्षातही आले नाही. तासाभराच्या चौकशीनंतर हार्वी हळूच स्टेम्सकडे आला आणि म्हणाला,

''मला त्याचा शोध लागलाय, ती बदमाश मुलगी खरं बोलली.''

''खरंच? मस्करी नाही ना करत?'' स्टेम्सला आश्चर्याचा धक्का बसला.

''आपल्याला माहिती देणाऱ्या मुलाची आता सुटी होईल, पण तो पुढच्या चौकात गल्लीत भेटेल.''

''तुला कोणी पाहिलं नाही ना?'' स्टेम्सने विचारले.

''छे, छे! कोणीसुद्धा नाही.''

स्टेम्स घाईघाईने गाडीकडे गेला. गाडी सुरू करून तो पुढच्या चौकात पोहोचेपर्यंत हार्वी एका सडपातळ, सुंदर दिसणाऱ्या सावळ्या तरुणाला घेऊन आला. पुढे स्टेम्सच्या बाजूला त्या तरुणाला बसवून, हार्वी मागच्या बाजूस बसला.

''जेसी, हा गुप्तहेर मुनसन, आणि रीच हा गझमन.'' हार्वीने ओळख करून दिली.

गझमनने पुढे केलेल्या हाताकडे स्टेम्सने दुर्लक्ष केले.

''तो जरा रागावलाय,'' हार्वी म्हणाला.

भित्र्या काजव्याप्रमाणे गझमनचे डोळे चमकले तो घाबरला.

''नाही, नाही सर, मी तर कार्यक्रमात असतो.''

''मी जर तुला काही प्रश्न विचारले तर खरीखरी उत्तरे देशील?'' स्टेम्सने विचारले.

गझमनच्या खांद्यावर थोपटत हार्वी म्हणाला, ''रीच, त्याला घाबरवू नकोस. ती मुलगी जेव्हा त्या नटाच्या अंगावर ओकली तेव्हा हा तिथेच होता.''

◆

अभिप्राय

शिवरायांच्या पार्थ पराक्रमाची गाथा : रणखैंदळ

राजा शिवछत्रपती. महाराष्ट्र राज्याचा इतिहासही आणि वर्तमानही. इथल्या मातीत जन्मलेल्या हरेक जीवाचा श्वासही आणि कित्येकांचा आयुष्यभराचा ध्यासही. मराठ्यांच्या इतिहासातली ही एकमेव अशी व्यक्तिरेखा आहे की तिनं भूत, वर्तमान आणि भविष्यावरही आपल्या असीम कर्तृत्वाची छाप टाकली आहे. तिच्या पार्थ पराक्रमाची गाथा तर इतिहासाच्या पानापानांवर कोरलेली. वर्तमानातल्या हरेक पक्षाच्या हरेक नेत्याला आजही त्यांच्याच नावाचा आश्रय घ्यावा लागतो, तर भविष्यातही कुणी त्यांच्या जयजयकाराशिवाय आपले पाय इथल्या राजकारणात घट्ट रोवून उभा राहील, अशी स्थिती नाही... ती कधी निर्माणही होणार नाही. स्थल, काल, भाषा आणि प्रांतांच्या सीमा ओलांडून गेलेलं हे या देशीचं नेतृत्व. हयातीतच त्यानं परदेशस्थ माध्यमांतही जागा मिळवलेली.

राजा शिवछत्रपती. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे सेनानी. भारतीय आरमाराचे जनक. इथल्या भूमीत स्वत्व आणि स्वाभिमानाचं रोपटं रुजविणारे. त्यांच्या कर्तृत्वाच्या नौबती चहुदिशांत घुमल्या. त्यांच्या पराक्रमाचे डंके सर्वदूर वाजत राहिले. त्यांच्या पाऊलखुणा इथल्या दऱ्याखोऱ्यांत उमटल्या. सह्याद्रीतल्या गडकोटांच्या तटाबुरुजांवर विसावल्या. त्याचा धांडोळा घेत या देशीचा हरेक पुत्र इथल्या मावळभूमीत दौडतोय. गेली साडेतीनशे वर्षं. यात इथली तरुणाई आहे, इथले प्रतिभावंत आहेत, इथले कलावंत आहेत आणि इतिहासानं झपाटलेले बुजुर्गही. इथल्या कलावंतांनी त्यांना रुपेरी पडद्यावर साकारण्याचा प्रयत्न केला,तर इथल्या प्रतिभावंतांनी त्यांची शब्दपूजा बांधली. शाहिरांनी त्यांचे पोवाडे गायिले, तर तुम्ही-आम्ही हरेक श्वासाबरोबर त्यांचा जयजयकार केला... आजही करतोय. गेल्या पिढीतल्या कवींनी त्यांच्यावर खंडकाव्यं लिहिली, नाटककारांनी नाटकं लिहिली तर लेखकांनी कादंबरीमाला लिहिल्या. खंडित



झालेली ती परंपरा पुन्हा सुरू केलीय विश्वास पाटील यांनी. 'महासम्राट' या नावानं ते शिवाजीराजांचा जीवनपट उलगडून सांगताहेत. तोही चार खंडांत. त्यातला पहिला खंड 'झंझावात' गेल्या वर्षी प्रसिद्ध झाला आणि तो हिंदी, इंग्रजी, कन्नडमध्येही गेला. आता त्या कादंबरीमालेतला दुसरा खंड प्रकाशित झालाय... 'रणखैंदळ'!

नावातच सर्वकाही सांगून जाणारी ही कादंबरी. पावनखिंडीतला थरार, सुरतेची लूट, तीस हजार मोगली फौजेचं उंबरखिंडीत केलेलं नि:शस्त्रीकरण, शाहिस्तेखानला वेसण, कुडाळचं युद्ध आणि सागराच्या पोटातलं 'शिवलंका' सिंधुदुर्ग निर्मितीचं अचाट स्वप्न! पस्तिशीच्या उंबरठ्यावर शिवरायांनी उडवलेली 'रणखैंदळ' हा या कादंबरीचा पट. हा पट मांडताना लेखकानं समकालीन साधनांचा धांडोळा घेतल्याचं पानोपानी जाणवत राहतं. सरदेसाई यांची मराठी रियासत, मराठीतील बखर वाङ्मय, शिवकालीन पत्रसारसंग्रह, सुरतकर इंग्रजांचा कंपनीशी झालेला पत्रव्यवहार, परदेशी इतिहासकारांनी केलेल्या नोंदी या साऱ्यांचा पुरेसा धांडोळा घेतल्याचंही प्रत्ययास येतं. शिवाय शिवचरित्रातील या घटना जिथं घडल्या त्या परिसरात तर गेली दहा-बारा वर्षं लेखकाची भटकंती सुरूच होती आणि आहे. हे सगळं असूनही 'रणखैंदळ'ची भाषा बखर वाङ्मयाच्या जवळ जाणारी नसून ती आधुनिक मराठी आहे, आजच्या वाचकाला सहज समजणारी आणि ओघवती आहे. काही नवख्या वाचकांना या कादंबरीत आलेले... तेही अगदी थोडकेच तत्कालीन शब्द समजणं सोपं जावं म्हणून त्यांच्या अर्थाचं परिशिष्ट शेवटी द्यायला हवं होतं.

१० नोव्हेंबर, १६५९ या दिवशी प्रतापगडाच्या पायथ्याशी असलेल्या 'जनीच्या टेंब्या'वर शिवाजीराजांनी अफझलखानाची भेट घेतली आणि त्याचा कोथळा काढला. या एकाच घटनेनंतर त्यांचं नाव देशभरात तर गेलंच, शिवाय ते परदेशातही पोहोचलं. या घटनेनं स्वराज्याचं बळ चहुअंगांनी वाढलं. त्यानंतर अठराव्या दिवशीच शिवाजीराजांनी पन्हाळगड हस्तगत केला. विजापूरकरांची ही दक्षिणेतली राजधानी... शहानबीदुर्ग. यामुळं आदिलशाही सत्ता हादरली; पण तिला जास्त धक्के बसले ते नेताजी पालकरांनी विजापूरवर केलेल्या चढाईनं. अफझलखानाच्या वधानंतर चौथ्या दिवशी नेताजींनी 'दारुल

सल्तनत' विजापूरच्या भिंतीला दिलेली धडक आदिलशाहीच्या काळजातच कळ उठवून गेली, या घटनेनं 'रणखैंदळ'ची सुरुवात होते. अवघ्या वीस-पंचवीस हजारांच्या नेताजींच्या तुकडीनं दीड-दोन दिवसांतच विजापूरची भिंत खिळखिळी केली आणि अवघं विजापूर हादरून गेलं. गंमत म्हणजे नंतर औरंगजेबाच्या दोन-अडीच लाखाच्या फौजेनं याच भिंतीला वर्ष-सव्वा वर्ष टक्कर दिली होती. तरीही त्याला यश मिळालं नव्हतं. नेताजींचा हा पराक्रम विश्वास पाटलांच्या शब्दांत वाचताना वेगळंच स्फुरण चढतं. नेताजींच्या या पराक्रमाविषयी आजवर फारसं लिहिलं गेलं नव्हतं. ती उणीव 'रणखैंदळ'नं भरून काढली आहे. एखाद्या महाकाव्याचा विषय व्हावा, असा हा नेताजी पालकरांचा पराक्रम. वाचकाला खिळवून ठेवणारा.

सिद्दी जौहरचा वेढा आणि पन्हाळ्यावर १३३ दिवस अडकून पडलेले शिवाजीराजे, वेढ्यातून निसटून जाताना भर पावसात त्यांनी केलेली ती रात्रीची दौड, बाजी-फुलाजी आणि बांदलांच्या सैन्यानं गाजवलेला गजापूरच्या खिंडीतला तो पराक्रम, शिवा काशिद, बाजी-फुलाजी आणि सिद्दी वाहवाहचं बलिदान यांचं वर्णन केवळ अंगावर काटा आणणारं. पन्हाळगड ते विशाळगड... पडत्या पावसात राजांनी केलेला तो थरारक प्रवास अनुभवण्यासाठी आजची तरुणाई धावत असते. लेखकानंही कित्येकदा हा अनुभव त्याच तिथीला घेतलेला असल्यानं तो वाचताना त्यांनी लिहिलेले शब्द जिवंत होतात, अंगावर रोमांच उभे राहतात. उत्कंठा, भीती, कुतूहल... भावनांची दाटी होते. दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी यांची 'पावनखिंडीचा गाझी' ही कविता आठवते आणि खिंडीतला तो रणसंग्राम नजरेसमोर उभा राहतो. या रणसंग्रामाचं वर्णन मराठी वाचकानं आजवर अनेकदा वाचलेलं असतं; पण सिद्दी वाहवाह आणि सेनापती धनाजी जाधवांचे वडील शंभुजी जाधव यांचा कागदपत्रांतच सीमित राहिलेला पराक्रम क्वचितच वाचलेला असतो. इतिहासाच्या पानांतच राहिलेली अशी अनेक मंडळी 'रणखैंदळ'च्या पानापानांवर भेटत राहतात... सिद्दी वाहवाह, दोरोजी फाकडे, 'हेर' विश्वासराव दिघे... अशा अनेकांच्या कर्तृत्वाला 'रणखैंदळ'नं न्याय दिला आहे.

'उंबरखिंडी'तली लढाई आणि कारतलबखान-रायबाघनशी लढण्यासाठी शिवाजीराजांनी आखलेले डावपेच आणि प्रत्यक्षातील लढाई यांचं वर्णन केवळ अप्रतिम. खरंतर या एवढ्या एकाच विषयावर युद्धपट काढता येईल. ही लढाई सर्वार्थानं वेगळी आणि जगभरातल्या लढायांच्या इतिहासात उठून

दिसणारी. ती तितक्याच समर्थ शब्दांत आपल्यासमोर उभी राहते. त्यापाठोपाठ राजापूरच्या इंग्रजांना दिलेला जबरदस्त तडाखा वाचायला मिळतो. शाहिस्तेखानावरील हल्ल्यापूर्वी नेताजींवर झालेला हल्ला, रुस्तुमेजमानं त्यांना दिलेला मदतीचा हात आणि जखमी अवस्थेतही नेताजी पालकर शाहिस्तेखानावरील हल्ल्यावेळी आंबील ओढ्यावर जातीनं उपस्थित असल्याचा निर्वाळा देणारी पत्रं या गोष्टींकडं जसं आजवर दुर्लक्ष झालं, तसंच शहाजी-शिवाजी या पिता-पुत्रांनी विजापूरवर संयुक्तपणे हल्ला करण्यासाठी केलेल्या नियोजनाकडेही. 'रणखैंदळ'मध्ये ही सारी हकिकत विस्तारानं वाचायला मिळते. शहाजी-शिवाजी या पिता-पुत्रांनी आखलेला तो डाव यशस्वी झाला असता तर चित्र बदललं असतं... पण तसं घडलं नाही, याची हुरहूर लागून राहते.

सुरतेची लूट म्हणजे शिवाजीराजांनी केवळ औरंगजेबाला नव्हे, तर इंग्रजांनाही दिलेला तडाखाच होता. या लुटीची नोंद तर लंडनहून प्रसिद्ध होणाऱ्या 'लंडन गॅझेट'नं पान एकवर घेतलेली. 'सुरत वॉज ट्रंबल्ड बाय द नेम ऑफ शिवाजी' ही त्यांच्या गव्हर्नरची नंतरच्या काळातील नोंद म्हणजे नेमकं काय, हे 'रणखैंदळ' मधली सुरतेची लूट वाचताना कळतं. वीरजी व्होरा लुटला गेला, त्याची झालेली लूट तर त्यानं स्वत:च नोंदवून ठेवलेली. या सगळ्या समकालीन साधनांचा धांडोळा आणि वापर पाटलांनी आपल्या लेखनात मुक्तहस्तानं केला आहे. तळकोकणात झालेली कुडाळची लढाई आजवर तशी दुर्लक्षितच राहिलेली. ती लढाई आणि ती संपल्यानंतर अवघ्या वीस दिवसांनी राजांनी सुरू केलेली सिंधुदुर्गाची बांधणी या दोन्ही घटना रोमहर्षक आणि अभिमानास्पद. शिवाजीराजांच्या उद्यमशीलतेचा आणि धाडसाचा दाखला देणाऱ्या. 'रणखैंदळ'च्या अखेरच्या पर्वात आहे शिवाजीराजांची मुधोळवरची स्वारी आणि 'शिवलंका' सिंधुदुर्गाची पायाभरणी.

मुधोळचे बाजीराजे घोरपडे हे भोसल्यांच्याच कुळीचे. शिवाजीराजांचे आप्तच; पण मराठ्यांत असलेल्या अंगभूत भाऊबंदकीनं पछाडलेले. त्यांनी शहाजीराजांना अनेकदा अडचणीत आणलेलं. त्याचा सूड घ्यावा अशी मनीषा शहाजीराजांनी व्यक्त केलेली आणि जिजाऊंनी तर तशी आज्ञाच राजांना केलेली. त्यांच्यावर शिवाजीराजांनी केलेल्या स्वारीचं वर्णन वाचताना पुन्हा दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी यांनी १९२८मध्ये लिहिलेली कविताच* आठवली.

मुधोळच्या स्वारीनंतर सिंधुदुर्गाच्या उभारणीची कथा 'रणखैंदळ'मध्ये येते. सिंधुदुर्गाच्या पायाभरणीसाठी शिवाजीराजांबरोबरच जिजाऊसाहेब आणि

राजांचा बहुतेक सर्व राणीवसा उपस्थित होता असं पाटील यांनी दाखवलं आहे. असेच काही नवे मुद्दे 'रणखैंदळ'मधून पुढे आणले आहेत. कोल्हापूरच्या लढाईत परमानंद नेवासकरांची उपस्थिती, बडी बेगम आणि शहाजीराजे यांच्यातील भावसंबंध, शिवा काशिद आणि सिद्दी जौहरची भेट, खंडोजी खोपडेंसाठी हैबतराव शिळीमकरांची रदबदली असे. शिवा काशिदचा पाठलाग सिद्दी मसूदनं केल्याचं आजवर वाचलेलं; पण इथं त्याची शिवा काशिदशी झालेली भेट येते आणि तोच त्यांना सिद्दी जौहरच्या तळाची वाट दाखवतो. रुस्तुमेजमानं शिवा काशिदला ओळखणंही तसं नवंच. आजवर ही ओळख पटवण्याची कामगिरी अफझलखानाचा पुत्र फाजलखानानं केल्याचं वाचनात आलेलं. या सगळ्या घटना लिहिताना पन्हाळ्याच्या घेरातल्या सगळ्या रानवाटा आणि वाड्यावस्त्यांची नोंद अतिशय बारकाईनं केली आहे. अर्थात याचं श्रेय या सगळ्या परिसरात लेखकानं केलेल्या भटकंतीलाच द्यायला हवं.

अफझलखान वध, सुरतेची लूट अशा काही घटनांनी शिवाजीराजांभोवती एक वलय निर्माण केलेलं आहे. या वलयामुळं एतद्देशियांइतकेच परकीयही अचंबित झालेले. त्याच्या नोंदी परकीयांच्या पत्रव्यवहारातून आणि शिवकाळात इथं येऊन गेलेल्या परकीय प्रवाशांच्या लेखनातून आढळतात. त्याची दखल घेत केलेलं हे लेखन. इतिहासाच्या रुमालात दडून राहिलेल्या अनेक व्यक्तिरेखांना समोर आणणारं.

दोरोजी फाकडे, मल्हारी मोरे, विश्वासराव दिघे अशी एरवी न दिसणारी पण प्रत्यक्षात असणारी पात्रं इथं भेटतात. 'रणखैंदळ' शिवचरित्रातील काही प्रसंगांची नवी मांडणी करते. शिवरायांच्या पार्थ पराक्रमाची गाथा सांगते. शिवाजीराजांचं सह्याद्रीशी असणारं नातं नव्यानं उलगडते. खरंतर राजांच्या इतर सेनानायकांसारखाच आणि तितकीच मोलाची कामगिरी पार पाडणारा सह्याद्री इथं वाचकाला उराउरी भेटतो.

शिवाजीराजांचं व्यक्तिमत्त्व आणि त्याभोवती असलेलं वलय आजवर मोजक्या चार-पाच घटनांवर आधारलेलं. 'श्रीमानयोगी'बाबत रणजित देसाईंना नरहर कुरुंदकरांनी जे पत्र लिहिलं होतं, त्यातही याकडं लक्ष वेधलेलं. जनमानसावर प्रभाव टाकणाऱ्या त्या मोजक्या घटना म्हणजेच शिवाजीराजांचं कर्तृत्व असं समजून लोक लिहीत राहिले; पण त्याहीपलीकडं जात, शोध घेत विश्वास पाटील यांनी 'रणखैंदळ'चा पट मांडलाय. तो विलोभनीय तर आहेच; शिवाय नवं काहीतरी हाती देणाराही आहे. 'रणखैंदळ' आपल्या हाती देऊन

पाटील यांनी शिवकाळाचा एक महत्त्वाचा तुकडा आपल्यापुढं उभा केला आहे. आता प्रतीक्षा आणि उत्सुकता आहे ती 'महासम्राट'च्या तिसऱ्या खंडाची... 'अस्मानभरारी'ची.

'रणखैंदळ' अर्पण केली आहे संयुक्त महाराष्ट्र आणि मायमराठीच्या अस्तित्वासाठी असामान्य झुंज दिलेल्या आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांना. 'रणखैंदळ'चं देखणं आणि समर्पक मुखपृष्ठ केलं आहे विजयराव बोधनकर यांनी तर 'महासम्राट'च्या कादंबरी चतुष्ट्याचे प्रकाशक आहेत मेहता पब्लिशिंग हाऊस. 'रणखैंदळ' ही त्यांचीच देखणी निर्मिती.

– सदानंद कदम

◆

*मुधोळचे बाजीराजे घोरपडे यांच्यावर शिवाजीराजांनी केलेल्या स्वारीचं वर्णन करणारी दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी यांची कविता (१९२८).

'जरि असाल अमुचे पुत्र, भोसले मर्द वंशाचे
बाजीला शासन द्यावे, अमुच्या प्राण-वैराचे'
कर्णांत शब्द हे घुमती, पूज्य त्या जन्मदात्याचे
बाजूच्या गृहवासाची
साधून संधी मोलाची
भ्रुकुटी चढली शिवबाची
डहुळला सिंधू कोणाचा, घेतला सूड जनकाचा...
वळवाचे जैसे मेघ, उसळती नभी एकाकी
वैशाख ऋतूचे पूर, आकस्मिक सिंधू तटाकी
ठाकली मुधोळा पुढती, मावळी फौजही बाकी
होऊन परांचे दास
स्वजनांच्याही कंठास
लाविती नीच जे फास
गाठला समूह तयांचा, घेतला सूड जनकाचा...
तरवारी घोरपड्यांच्या, जणू मृत्यू मुखांतिल रसना
कोषांतुनि बाहिर आल्या, की क्रुद्ध भुजंगम ललना
इकडे तर घेइ भरारी, गरुडाची केवळ सेना
ढालीस लागली ढाल

नाचले तीक्ष्ण करवाल
एकेक पडे घायाळ
घातला सडा रुधिराचा, घेतला सूड जनकाचा...
शिव-शंकर दोघांमध्ये, कांहीही नव्हता भेद
पाहवे न मुख रायाचे, सुडाचा नयनी क्रोध
एकेक गजासुर योद्धा, गाठून करी तद्भेद
खड्गाच्या घाटावरचे
पाणी जे प्याले साचे
रणशूर मुधोळावरचे
केला नि:पात तयांचा, घेतला सूड जनकाचा...
'तो कुठे? जयाने धरिले, निजजनकाला कपटाने
लाविली गळ्याला चीप, भोसलेकुल-द्वेषाने'
शोधीत फिरे जो भूप, ठाकला तोहि शौर्याने
उसळले हात दोघांचे
शौर्यात चपलता नाचे
यश थोर जिजापुत्राचे
लाविला टिळा रक्ताचा, घेतला सूड जनकाचा...
हा भाऊ घोरपड्यांचा, हा भाचा घोरपड्यांचा
हा कुमार हा तो पुतण्या, ठेचला वंश सापाचा
तीनशे मारिले खासे, केला उच्छेद खलांचा
वैऱ्यांचे झाले सत्र
वाचला एकचि पुत्र
तेथे तो नव्हता मात्र
हा प्रभाव शिवकोपाचा, घेतला सूड जनकाचा...
जीवितही तृण मानावे, जननि जनक यांच्यासाठी
तळहातावर शिर घ्यावे, अपुल्या जन्मभूसाठी
काळासह झुंज करावी, प्राणप्रिय धर्मासाठी
हा क्षत्रिय-धर्म पवित्र, गाववी यदीय चरित्र, तो पूज्य असे सर्वत्र
पाळिला धर्म पुत्राचा, घेतला सूड जनकाचा...

◆

१६ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर २०२३ दरम्यानचा दिनविशेष

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

खालील संचांवर १६ ते ३१ ऑगस्ट दरम्यान खास सवलत

१७ ऑगस्ट - सचिन पिळगांवकर यांचा जन्मदिन

'हाच माझा मार्ग' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ५४०/- । सवलत किंमत ३५९/-

---

१८ ऑगस्ट-गुलज़ार यांचा जन्मदिन

'त्रिवेणी', 'रावीपार', 'गुलज़ार पटकथा', 'धागे' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत १७३५/- । सवलत किंमत १०७७/-

---

१९ ऑगस्ट - सुधा मूर्ती यांचा जन्मदिन

'आजीच्या पोतडीतल्या गोष्टी', 'अस्तित्व', 'आयुष्याचे धडे गिरवताना', 'बकुळा', 'डॉलर बहू', 'गरुडजन्माची कथा', 'गोष्टी माणसांच्या', 'हरवलेल्या मंदिराचे रहस्य', 'कल्पवृक्षाची कन्या', 'महाश्वेता', 'परीघ', 'पितृऋण', 'सुकेशिनी आणि इतर कथा', 'थैलीभर गोष्टी', 'वाइज अँड अदरवाइज', 'स्वर्गाच्या वाटेवर काहीतरी घडलं...', 'पुण्यभूमी भारत', 'सामान्यांतले असामान्य', 'सर्पाचा सूड', 'आजी-आजोबांच्या पोतडीतल्या गोष्टी', 'तीन हजार टाके', 'त्रिशंकू', 'दोन शिंगे असलेला ऋषी', 'हरवलेल्या गोष्टीचे रहस्य', 'गोपीची डायरी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ५२५५/- । सवलत किंमत ३९४१/-

---

१९ ऑगस्ट - जॅक कॅनफिल्ड यांचा जन्मदिन

'चिकन सूप' मालिकेतील ६१ पुस्तकांवर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत १३२५०/- । सवलत किंमत ९८७९/-

---

१९ ऑगस्ट - फ्रॅन्क मॅक्कोर्ट यांचा जन्मदिन

'अँजेलाज अॅशेस' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ३८०/- । सवलत किंमत २८९/-

---

२० ऑगस्ट - नारायण मूर्ती यांचा जन्मदिन

'नारायण मूर्ती : मूल्यं जपणारं एक अद्वितीय आयुष्य', 'अ बेटर इंडिया अ बेटर वर्ल्ड' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ४३५/- । सवलत किंमत २९९/-

---

२० ऑगस्ट - एस. एल. भैरप्पा यांचा जन्मदिन

'पर्व', 'वंशवृक्ष', 'काठ', 'आवरण', 'मंद्र', 'पारखा', 'तडा', 'तंतू', 'परिशोध', 'सार्थ', 'उत्तरकांड', 'साक्षी', 'गृहभंग' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ५३४०/- । सवलत किंमत ४००४/-

---

२१ ऑगस्ट - ब्रॅड थॉर यांचा जन्मदिन

'ब्लॅक लिस्ट', 'फुल ब्लॅक' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ९००/- । सवलत किंमत ६०९/-

---

२३ ऑगस्ट - नेल्सन डेमिल यांचा जन्मदिन

'द लायन्स गेम ' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ६९५/- । सवलत किंमत ४९९/-

---

२४ ऑगस्ट - अलेक्झांडर मॅक्काल स्मिथ यांचा जन्मदिन

'मोरॅलिटी फॉर ब्यूटिफुल गर्ल्स', 'टिअर्स ऑफ द जिराफ', 'द नंबर वन लेडिज डिटेक्टिव्ह एजन्सी', 'द फुल कबर्ड ऑफ लाइफ' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ८९०/- । सवलत किंमत ६४९/-

---

२५ ऑगस्ट - तसलिमा नासरिन यांचा जन्मदिन

'लज्जा', 'फेरा', 'निर्बाचित कलाम', 'नष्ट मेयेर नष्ट गद्य', 'निर्बाचित कबिता', 'आमार मेयेबेला', 'उधाण वारा', 'फरासि प्रेमिक', 'द्विखंडित', 'शोकोलग्रिह हारालोजार', 'भाबनागुलो', 'बेशरम' या पुस्तकसंचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ३३३०/- । सवलत किंमत २४३९/-

---

२५ ऑगस्ट - फ्रेडरिक फोरसाइथ यांचा जन्मदिन

'नो कम बॅक्स', 'द अफगाण', 'द फिस्ट ऑफ गॉड', 'मध्यस्थ', 'द ओडेसा फाइल', 'द किल लिस्ट', 'द डे ऑफ द जॅकल' या पुस्तकसंचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत २९७५/- । सवलत किंमत १९९३/-

२५ ऑगस्ट - पुरुषोत्तम अग्रवाल यांचा जन्मदिन
'नाकोहस' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत १९५/- । सवलत किंमत १३९/-

२६ ऑगस्ट - नॅन्सी यी फान यांचा जन्मदिन
'तलवारीचा शोध' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत १९०/- । सवलत किंमत १३९/-

२९ ऑगस्ट - धिरेंद्र मेहता यांचा जन्मदिन
'छावणी' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १४९/-

२९ ऑगस्ट - इनग्रिड बर्गमन यांचा जन्मदिन
'माय स्टोरी' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ४९५/- । सवलत किंमत ३३९/-

३१ ऑगस्ट - शिवाजी सावंत यांचा जन्मदिन
'मृत्युंजय', 'छावा', 'युगंधर', 'मृत्युंजय' (नाटक), 'छावा' (नाटक), 'मोरावळा', 'कांचनकण', 'शेलका साज', 'अशी मने असे नमुने', 'कवडसे' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ३२४५/- । सवलत किंमत २३४६/-

खालील संचांवर १ ते १५ सप्टेंबर दरम्यान खास सवलत

१ सप्टेंबर - कुंदन तांबे यांचा जन्मदिन
'नाना आणि महादजी' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १३९/-

२ सप्टेंबर - नसीमा हुरजूक यांचा जन्मदिन
'चाकाची खुर्ची' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १५९/-

२ सप्टेंबर - शुभदा गोगटे यांचा जन्मदिन

'अस्मानी', 'चला जाणून घेऊ या! फेंग शुई', 'चला जाणून घेऊ या! सुख', 'चला जाणून घेऊ या! रेकी', 'चला जाणून घेऊ या! तणाव व राग', 'चला जाणून घेऊ या! स्मरणशक्ती कशी वाढवावी', 'घर', 'हृदयविकार निवारण', 'निरामय यशासाठी ध्यान', 'सांधा बदलताना', 'वसुदेवे नेला कृष्ण' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत १७७५/- । सवलत किंमत १०८९/-

२ सप्टेंबर - व्हिक्टर फ्रॅन्कल यांचा जन्मदिन

'अर्थाच्या शोधात' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १२०/-

३ सप्टेंबर - जी. बी. देशमुख यांचा जन्मदिन

'कुलामामाच्या देशात', 'अ-अमिताभचा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ५००/- । सवलत किंमत ३७५/-

५ सप्टेंबर - जागतिक शिक्षक दिन

'टू सर, विथ लव्ह', 'चिकन सूप फॉर द सोल इंडियन टीचर्स', 'स्टोन्स इन्टू स्कूल्स', 'थ्री कप्स ऑफ टी', 'मी मलाला' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत १४७०/- । सवलत किंमत ८८२/-

६ सप्टेंबर - नितीन बापट यांचा जन्मदिन

'आंधळा न्याय' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत १९५/- । सवलत किंमत १३९/-

८ सप्टेंबर - लीना सोहोनी यांचा जन्मदिन

लीना सोहोनी यांनी अनुवादित केलेल्या ५५ पुस्तकांवर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत १७३२५/- । सवलत किंमत १२९९५/-

१० सप्टेंबर - डॉ. एम. बी. कुलकर्णी यांचा जन्मदिन

'शब्दचर्चा' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ४००/- । सवलत किंमत २७९/-

---

१० सप्टेंबर - नील डोनाल्ड वॉल्श यांचा जन्मदिन

'संवाद परमेश्वराशी - भाग २', 'संवाद परमेश्वराशी - भाग ३' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ७१५/- । सवलत किंमत ५२९/-

---

१० सप्टेंबर - विजया जहागिरदार यांचा जन्मदिन

'कर्मयोगिनी (इंग्लिश)' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २७९/-

'कर्मयोगिनी (मराठी)' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ४००/- । सवलत किंमत ३२०/-

---

१० सप्टेंबर - सुनील दांडेकर यांचा जन्मदिन

'आगमन' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत २६०/- । सवलत किंमत १८९/-

---

१० सप्टेंबर - प्रा. पुरुषोत्तम रामदासी यांचा जन्मदिन

'डेस्टिनेशन', 'बाईची गोष्ट' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ५१०/- । सवलत किंमत ३८३/-

---

१२ सप्टेंबर - बिभूतिभूषण बॅनर्जी यांचा जन्मदिन

'पथेर पांचाली' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २७९/-

---

१३ सप्टेंबर - रॉय मॉक्झॅम यांचा जन्मदिन

'असा लुटला भारत' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २६३/-

---

१४ सप्टेंबर - कांचन घाणेकर यांचा जन्मदिन

'नाथ हा माझा', 'रेशीमगाठी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ५६५/- । सवलत किंमत ४२९/-

१५ सप्टेंबर - दया पवार यांचा जन्मदिन

'विटाळ', 'चावडी', 'जागल्या', 'पासंग', 'कोंडवाडा', 'पाणी कुठंवर आलं गं बाई...' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ६७५/- । सवलत किंमत ४७९/-

१५ सप्टेंबर - स्टीफन ऑल्टर यांचा जन्मदिन

'हिमालयारण्यक' या पुस्तकावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ६५०/- । सवलत किंमत ४८८/-

◆

आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाइल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्सॲप नंबरवर कळवावी.

९४२०५९४६६५

कास्ट मॅटर्स

जातीबाबत खोलवर रुजलेल्या भावना आणि विषमतामूलक व्यवस्थेचं परखड परीक्षण...
पहिल्या पिढीचे दलित अभ्यासक
डॉ. सुरज एंगडे यांचं धाडसी आत्मकथन

अल्पावधीतच तिसरी आवृत्ती प्रसिद्ध

लेखक
डॉ.सुरज एंगडे
अनुवाद
प्रियांका तुपे । प्रणाली एंगडे



सहा वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर नव्या दमात, नव्या जोषात, त्याच आकर्षक रूपात व मांडणीत **मृत्युंजय, छावा** आणि **युगंधर** पुन्हा एकदा वाचकांच्या भेटीस आले आहेत...

शिवाजी सावंत

₹६४०



₹७५०

₹७५०

'Registered' Postal Reg. No. PCW/086/2021 – 2023

RNI. No. MAHMAR/2000/02739

Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.

Publication Date : 11/08/2023 Posting Date : 11/08/2023

आवर्जून वाचावे...







मेहता मराठी ग्रंथजगत

१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति, _____

_____

_____

_____

_____

_____

_____